MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी..एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक ५ / मे २०१५

## संपादकीय

### आधुनिक भारताचे एक महान नेते : गोपाळ कृष्ण गोखले

राष्ट्रपिता माहात्मा गांधी यांनी ज्यांना आपले राजकीय गुरू मानले व ज्यांच्या ''सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'' या संस्थेची पताका आजही भारतीयांच्या हृदयात फडकते अशा नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जयंतीला नुकतीच १५० वर्षे पूर्ण झाली. गोपाळ कृष्ण गोखले व लोकमान्य टिळक हे समकालीन भारतातील अत्यंत चिकित्सक असे भाष्यकार होते.

९ मे १८६६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यात एका सामान्य कुटुंबात जन्मलेले गोपाळ कृष्ण गोखले आधुनिक भारताचे एक महान व नेमस्त विचारसरणीचे नेते मानले जातात. १८ व्या वर्षी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी सरकारी नोकरीचा मार्ग न स्वीकरता स्वार्थत्यागपूर्वक देशसेवा करण्याचे व्रत घेतले. २० व्या वर्षी ते फर्युसन महाविद्यालयात प्राध्यापक झाले आणि त्यांनी सुधारकपत्राचे सहसंपादक म्हणून काम सुरू केले.

गोपाळ कृष्ण गोखले व लोकमान्य टिळक यांचे सार्वजनिक जीवन एकाच वेळी सुरू झाले; पण या दोघांचा मार्ग आणि विचारसरणी थोडीशी भिन्न होती. टिळक जहाल विचारसरणीचे तर गोखले नेमस्त होते. ब्रिटिशांशी मुद्देसूद चर्चा करून शिताफीने विषय गळी उतरविण्यात गोखले वाकबगार होते तर आपल्या ओजस्वी वाणीने सरकारचे डोके ठिकाणावर आणत स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्कासाठी लोकमान्य टिळक लढत होते. 'जहाल व मवाळ' अशी काँग्रेसमध्ये पडलेली उभी फूट टिळक व गोखले या दोन एकाच ध्येयासाठी लढणाऱ्या दोन तलवारींनी परजत होती. मात्र गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या ठायी असलेली देशनिष्ठा, विद्वत्ता व संततुल्य व्यक्तिमत्त्वाने महात्मा गांधीदेखील प्रभावित झालेले दिसून येते. गोखले यांनी लोकशिक्षणाद्वारे समाजजागृती करण्याचा व राजकीय सुधारणांसाठी सतत प्रयत्न करून ज्या सवलती मिळतील त्या राबविण्याचा मार्ग स्वीकारला. न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्यत्व पत्करून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादींचा सखोल अभ्यास केला. अभ्यासपूर्ण विवेचन कसे करावे याचे मूर्तिमंत रूप म्हणजे नामदार गोखले.

गोपाळ कृष्ण गोखले हे आधुनिक भारताच्या उभारणीतील अग्रदूत होते. कर्तव्यासाठी कोणताही काळ अकाल नसतो या तत्त्वनिष्ठ वृत्तीने गोखल्यांनी देशाच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलला. लहानपणी शेक्सपियरची नाटके, जॉन मिल्टनचे 'पॅराडाइज लॉस्ट', एडमंड बर्कची भाषणे यांतील कितीतरी इंग्रजी उतारे गोखले बिनचूक तोंडपाठ म्हणून दाखवीत. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व हे इतके विलक्षण होते की जन्माने इंग्रज माणूससुद्धा त्यांच्या भाषेवर लुब्ध होत

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

असे. गांधी गोखल्यांबद्दल म्हणाले होते, "Gokhale was as pure as crystal gentle as lamb, brave as a lion and chivalrous to fault and the most Perfect man in the Political fild." 'सनदशीर मार्गाने लढा' हा गोखले यांच्या विचाराचा गाभा होता. किंबहुना एतद्देशीय उदारमतवादाचा आदर्श वस्तुपाठ म्हणून गोखले यांचे यथार्थ वर्णन करता येईल. आजची काँग्रेस म्हणजे त्या वेळच्या राष्ट्रीय सभेला दिग्दर्शन करणाऱ्या नेत्यांत त्यांची गणना होते.

सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोनही आघाड्यांवर काम करताना त्यांची भूमिका मवाळ राहिली, त्यामुळे टिळक व त्यांच्या अनुयायांच्या कठोर टीकेचा त्यांना सामना करावा लागला. पण तत्कालीन सामाजिक आणि राजकीय स्थितीचे आकलन व अभ्यास यांबाबत गोखले समकालीन नेत्यांच्या फार पुढे होते. म्हणूनच त्यांनी गांधीजींना एक वर्षभर डोळे व कान उघडे ठेवून भारतभर फिरण्याची सूचना केली होती. ''टिळक हिमालयाप्रमाणे, फिरोजशहा महासागराप्रमाणे तर गोखले गंगेप्रमाणे वाटले'' असे गांधीजींनी म्हटले आहे ते अर्थपूर्ण आहे. प्रस्थापित यंत्रणेतील दोष कसे दूर करता येतील व शक्य ते साध्य कसे करून घेता येईल याचा विचार करून त्या दिशेने प्रयत्न करण्याची गोखले यांची वृत्ती होती. सनदशीर राजकारणावर भिस्त ठेवणाऱ्या त्यांच्या विचारसरणीमुळे जहालमतवाद्यांकडून त्यांची अतिशय निर्भर्त्सना झाली. पण गोखले यांचे कर्तृत्व, देशसेवा, स्वार्थत्याग, अभ्यास यांबद्दल सरकारप्रमाणेच लोकपक्षाचे नेतेही आदर बाळगीत. लोकमान्यांनी गोखल्यांवरील मृत्युलेखात त्यांच्या या गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. लोकपक्ष व सरकार या दोघांकडून मान्यता मिळणारा असा पुरुष विरळाच सापडतो.

गोखले १९०२ मध्ये मध्यवर्ती कायदेमंडळावर निवडून गेल्यावर त्यांनी अर्थसंकल्पावर जे भाषण केले त्यामुळे त्यांचे कर्तृत्व व नेतृत्व देशमान्य झाले. त्यांनी अर्थसंकल्पावर केलेल्या भाषणात तत्कालीन भारताच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, भारताची शेती-शेतकऱ्यांच्या अडचणी, आयात निर्यात, कारभार, उद्योग, रुपयाचे पौंडाशी नाते, लष्करावरील खर्च इत्यादी विषय व्यासंगपूर्ण व मुद्देसूदपणे मांडलेले दिसून येतात. १९०६ सालच्या अर्थसंकल्पावरील गोखले यांचे भाषण ऐकल्यावर, 'असे भाषण इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये क्वचितच ऐकावयास मिळते' असा अभिप्राय व्हायसरॉय लॉर्ड मिंटो यांनी दिला. महात्मा गांधी यांच्यासोबतच बॅरिस्टर जीनासुद्धा गोखले यांच्या विद्वत्तेने प्रभावित झाले होते. अशा या महान नेत्याच्या १५० व्या जयंतीची योग्य ती दखल शासनाने व विविध माध्यमांनी घेतलेली दिसून येत नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून ६९ वर्षे होत आहेत. भारतातील सध्याच्या राजकारणात गोखल्यांसारखी अभ्यासपूर्ण विषयमांडणी करणारे नेते क्वचितच आढळतात. गोखल्यांच्या चरित्रअभ्यासातून सध्याच्या राजकारण्यांना निश्चितच मार्गदर्शन मिळू शकते. अल्पस्वल्प कामाच्या आधारावर पुतळे आणि स्मारके उभारण्याच्या या जमान्यात गोखले यांचे त्यांच्या कार्यकर्तृत्वाला शोभेल असे स्मारक निश्चितच सर्वांना प्रेरणादायी ठरेल. गोखले यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल घेऊन पुणे येथे भारतातील अर्थशास्त्रविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेला त्यांचे नाव देण्यात आले आहे (गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स). १९३० मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेत अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांत संशोधन करणे, विविध प्रकारच्या आर्थिक व्यवहारांची तपशीलवार व शास्त्रीय पद्धतीने माहिती संकलित करणे व त्यासाठी कार्यकर्ते तयार करणे हे काम चालते. असे असले तरी आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे योगदान पाहता अशा प्रकारची आणखी अभ्यासकेंद्रे (स्मारके) उभारणे ही काळाची गरज आहे. हीच खरी नामदार गोखले यांना मानवंदना ठरेल.

**डॉ. विजय बेडेकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक ५ / मे २०१५

| | |
|---|---|
| **संपादक**<br>डॉ. विजय बेडेकर<br><br>'दिशा' प्रारंभ जुलै १९९६<br>(वर्ष १९ वे/अंक ११वा)<br><br>**कार्यालय/पत्रव्यवहार**<br>विद्या प्रसारक मंडळ<br>डॉ. बेडेकर विद्या मंदिर<br>नौपाडा, ठाणे - ४०० ६०२<br>**दूरध्वनी : २५४२ ६२७०**<br>**www.vpmthane.org**<br><br>**मुद्रणस्थळ :**<br>परफेक्ट प्रिण्टस्,<br>नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.<br>**दूरध्वनी : २५३४ १२९१**<br>**२५४१ ३५४६**<br>**Email:perfectprints@gmail.com** | *अनुक्रमणिका* |

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | चिनी नववर्ष समारंभाचा व्हिएतनामी अनुभव | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | व्यक्तिवेध-४ : होर्मसजी जहांगीर भाभा | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १६) | श्री. अरविंद ओक | १६ |
| ५) | ''अणुरेणुया थोकडा तुका आकाशाएवढा'' | श्री. प्रशांत धर्माधिकारी | १९ |
| ६) | मेंदू : एक दिशादर्शक | श्री. मनोहर तळेकर | २३ |
| ७) | हैद्राबाद व्हाया श्रीशैलम ते मंत्रालय | श्री. चंद्रकांत शिंगाडे | २४ |
| ८) | 'परनिंदेचे व्यसन' | ज्योती सीताराम शिंदे | २६ |
| ९) | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय : एक दृष्टिक्षेप | श्री. संतोष पांगे | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# चिनी नववर्ष समारंभाचा व्हिएतनामी अनुभव

*व्हिएतनामच्या नववर्ष समारंभाचे अविस्मरणीय वर्णन करणारा लेख - संपादक*


मागील दहा वर्षे विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने आम्ही शिक्षकांना इंग्लंड सहलीला घेऊन जात आहोत. २००७ च्या उन्हाळ्यात आम्ही बर्मिंगहॅमला गेलो होतो. त्या गटात महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांतून आलेले शिक्षक होते. त्यात एक शिक्षक औरंगाबाद या शहरातून आले होते. त्यांचे नाव संदीप कुलकर्णी. इंग्लंड सहलीवरून परत आल्यावर त्यांनी परदेशातील आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये अर्ज करायला सुरुवात केली. त्यांच्या प्रयत्नाला यश आले. सध्या ते विज्ञान शिक्षक म्हणून हो चि मिन्ह शहरात काम करतात. हे शहर देशाच्या दक्षिण भागात असून त्याचे आधीचे नाव सायगाव असे होते. ते बदलून हो चि मिन्ह असे करण्यात आले. व्हिएतनाम देशाची राजधानी देशाच्या उत्तर भागात असलेल्या हनोई या शहरात आहे. परंतु देशाची आर्थिक प्रगती दक्षिण भागात जास्त झाली असल्याने या शहराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातल्या वेगवेगळ्या भागांत राहणारे लोक कामाच्या निमित्ताने या शहरात वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी या शहरात आंतरराष्ट्रीय शाळांची निर्मिती करण्यात आली आहे. या मालिकेतील एक शाळा आहे व्हिएतनाम-ऑस्ट्रेलिया आंतरराष्ट्रीय शाळा. याच शाळेत संदीप कुलकर्णी कामाला लागले. तिथून त्यांनी आम्हांला व्हिएतनाम भेटीचे निमंत्रण पाठविले. त्यांच्या निमंत्रणावरून मी आणि डॉ. रंजन गर्गे व्हिएतनामला जाऊन आलो.

एकदा जायचे ठरल्यानंतर आम्ही तारखांचा विचार करू लागलो. आम्ही दोघेही या देशात प्रथमच जात होतो. त्यामुळे आम्हांला स्थानिक व्यक्तीच्या मदतीची गरज होती. त्याचबरोबर, संदीपनी आम्हांला इकडे तिकडे फिरवावे अशी अपेक्षाही होती. तशी अपेक्षा आम्ही व्यक्तदेखील केली. त्यावर त्यांनी कळविले की फेब्रुवारी महिन्यात १४ तारखेपासून २१ तारखेपर्यंत त्यांना सुट्टी असल्याने हा कालावधी आमच्या भेटीसाठी योग्य होईल. पडत्या फळाची आज्ञा मानून आम्ही हा कालावधी आमच्या भेटीसाठी नक्की करून टाकला. शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी आम्ही हो चि मिन्ह सिटीला पोहोचलो. विमानतळावरून संदीपच्या घराकडे जाताना सर्वत्र सजावट केलेली आम्हांला आढळली. रस्त्याचा दोन्ही बाजूला आणि मधोमधदेखील विजेच्या दिव्यांची रोशणाई केलेली होती. आपल्याकडे दिवाळीत करतात अशीच ती रोशणाई होती. हा अनुभव आमच्यासाठी नवीन होता.

फेब्रुवारी महिन्यात तिसऱ्या आठवड्यात सुट्टी आहे याची माहिती संदीपनी आम्हांला दिली होती. परंतु ती सुट्टी कशाची आहे हे त्यांनी आम्हाला सांगितले नव्हते. तिथे गेल्यावर कळले की ती सुट्टी नववर्षाची होती. नववर्षाचे कौतुक सर्वांनाच असते. परंतु ते साजरे करण्यासाठी एक आठवडयाची सुट्टी ही बाब आमच्यासाठी नवीन होती. थोडी माहिती काढल्यानंतर असे कळले की, फेब्रुवारी महिन्यात १९ तारखेला चिनी कालगणनेनुसार नवीन वर्ष सुरू होईल. मी आठवण करण्याचा प्रयत्न करू लागलो. याच दरम्यान महाशिवरात्रीचा सण येतो हे माझ्या लक्षात आले. याचे कारण त्या दिवशी उपास करायला विसरायचे नाही असे मला निघताना बजावून सांगण्यात आले होते. फेब्रुवारी महिन्याची १९ तारीख म्हणजे फाल्गुन महिन्याचा पहिला

दिवस. हाच दिवस चिनी नववर्ष दिन होता. याचा अर्थ भारतीय कालगणनेप्रमाणेच चिनी कालगणनादेखील चंद्रगतीवर आधारलेली आहे. चंद्र-सूर्याच्या गतीचा मेळ बसविण्यासाठी आपल्याप्रमाणेच त्यांच्याकडेदेखील अधिक मास असतो.

चिनी नववर्ष चीनमध्ये आणि चीनप्रभावित देशांमध्ये मोठ्या आनंदाने साजरे करतात. व्हिएतनाम हा चीनला जोडून असलेला देश. अनेक वर्षे व्हिएतनामवर चिनी प्रभाव होता. मिंग राज्याच्या राजवटीत हा भाग चीनमध्येच होता. त्यामुळे चिनी संस्कृती, चिनी भाषा, चिनी साहित्य यांचा व्हिएतनामी लोकांवर प्रभाव पडला. मधल्या काळात शेजारी असलेल्या कंबोडिया देशाची संस्कृती आणि युरोपियन संस्कृती यांच्या संपर्कात ते आले. तरीही अनेक वर्षांचा चिनी प्रभाव कायम राहिला. नववर्षानिमित्ताने समारंभ साजरे करणे हा त्याचाच एक भाग आहे. तो ते मोठ्या आनंदाने साजरा करतात. या निमित्ताने कुटुंबातील सगळे लोक एकत्र येतात. आपल्याकडे कोकणात गणपतीच्या निमित्ताने लोक एकत्र येतात तसाच काहीसा हा प्रकार आहे. शहरात आपले नशीब आजमावायला आलेले लोक आपापल्या गावाला परत जातात. त्यामुळे वाहतूक यंत्रणेवर ताण पडतो. काही खाजगी कंपन्या प्रवासाचे भरमसाट पैसे लावतात. कामकरी मंडळी गावाकडे गेली असल्याने शहरात जरा कमी गर्दी असते. तरीही शहरात सर्वत्र चांगली रोशणाई केलेली असते.



**ऑपेरा हाउसची इमारत**

रात्रीचे जेवण झाल्यावर आम्ही शहराचा फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडलो. रस्त्यावर मोठ्या संख्येने दुचाकी वाहने होती. त्यांच्या गर्दीतून वाट काढत आम्ही पुढे पुढे चाललो होतो. रस्त्याच्या मधोमध वेगवेगळा आकार निर्माण करणारे लहान लहान दिवे लावले होते. आजूबाजूला इमारतींवर दिव्यांची माळ लावलेली होती. सगळा परिसर रंगीबेरंगी प्रकाशात न्हाऊन निघाला होता. त्यामुळे संपूर्ण परिसर मनमोहक झाला होता. आमच्याकडे असलेल्या कॅमेऱ्याने आम्ही शक्य तेवढे फोटो घेतले.




**रस्त्यावरची रोशणाई**



**बागेतील रोशणाई**

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही शहर पाहण्यासाठी बाहेर पडलो. आदल्या दिवशी रात्री लक्षात आले नव्हते, परंतु सूर्याच्या उजेडात घराच्या प्रवेशद्वारावर ठेवण्यात आलेल्या बोनसायने आमचे लक्ष वेधून घेतले. न विसरता आम्ही त्यांचे फोटो काढले. त्यानंतर मोटारसायकल घेऊन शहराच्या मध्यवर्ती भागाकडे जाऊ लागलो. आमच्या असे लक्षात आले की शहरात जागोजागी वनस्पतींचे बोनसाय ठेवून सजावट करण्यात आली होती. राहती घरे, कार्यालये सगळीकडे बोनसायच बोनसाय. काही लोक

पात्रता नाही म्हणून आपण परस्परांना भेटणे बंद केले तर आपल्यापैकी बऱ्याच जणांना अज्ञातवासात जावे लागेल. - रवींद्रनाथ टागोर

तर आपल्या लहानशा वाहनावर बोनसाय बांधून घरी नेत होते. शहराच्या मध्यवर्ती भागात एक मोठी बाग आहे. या बागेत वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पतींचे बोनसाय विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. त्यांत खूपच विविधता होती. काही आकाराने अगदीच लहान तर काही खूपच मोठे होते. बागेतील वनस्पतींपेक्षा हे बोनसायच जास्त उठून दिसत होते. हे सगळे पाहिल्यावर बोनसायचे एवढे महत्त्व का असा प्रश्न मनात आपोआप निर्माण झाला. त्याचे उत्तरही तेवढेच मनोरंजक आहे.



**मनमोहक बोनसाय**

मोठ्या झाडाचे छोटेखानी रूप म्हणजे बोनसाय होय. त्यासाठी मोठ्या झाडाचे रोपटे लहानशा कुंडीत लावतात. त्यांना मर्यादित प्रमाणात खत आणि पाणी देतात. त्यामुळे झाडांची पूर्ण वाढ होत नाही. परंतु त्या झाडांच्या वाढीतले सगळे टप्पे पूर्ण होतात. या झाडांना फुले आणि फळेदेखील येतात. अशी खुजी झाडे बोनसाय म्हणून ओळखली जातात. बोनसाय हा मुळातला जपानी शब्द आहे. याचे कारण खुजी झाडे तयार करण्याची कला प्रथम जपानमध्ये विकसित झाली. जपानी भाषेत बोन याचा अर्थ कमी खोली असलेले पात्र असा असून रोपट्याला साई असे म्हणतात. बोनसाय हा शब्द मूळ पेनसाय या चिनी शब्दामधून आलेला आहे अशीही माहिती संदर्भग्रंथामध्ये मिळते. दिसायला सर्वच प्रकारचे बोनसाय सुंदर दिसतात. म्हणून अनेक प्रकारच्या वनस्पतींचे बोनसाय बनवून विक्रीसाठी ठेवले जातात. या प्रकाराची सुरुवात जरी जपानमध्ये झाली तरी बोनसायचे लोण सगळीकडे पसरले आहे. व्हिएतनाममध्ये बोनसायला वेगळेच महत्त्व आहे. तेथे बोनसायला समृद्धीचे लक्षण मानले जाते. म्हणूनच नववर्षाच्या निमित्ताने त्याची खरेदी केली जाते. आपल्याकडे असलेली समृद्धी दाखविण्यासाठी त्याचे प्रदर्शन करण्याची तेथे प्रथा आहे. केवळ नववर्षालाच नव्हे तर वर्षभर आशा बोनसायला कामाच्या टेबलवर ठेवण्याची प्रथा तिथे प्रचलित आहे.



**पर्यटन कार्यालयाच्या टेबलावर ठेवलेले बोनसाय**

नववर्षाच्या पूर्वसंध्येला आम्ही परत एकदा शहरात गेलो. त्या दिवशी दिव्यांची रोशणाई होतीच. याखेरीज एक मोठे प्रदर्शन भरविण्यात आले होते. संपूर्ण रस्ता वाहतुकीला बंद करून तेथे सुबक पद्धतीने लांबलचक असे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ते प्रदर्शन पाहण्यासाठी लोकांची झुंबड उडाली होती. गर्दीतून वाट काढत आम्ही प्रदर्शन पाहत होतो. एका बाजूला चित्रांचे प्रदर्शन होते. त्यात व्हिएतनाम देशाचा इतिहास, व्हिएतनामचे अमेरिकेशी झालेले ऐतिहासिक युद्ध, देशाचा स्वातंत्र्य संग्राम या बाबींची इत्यंभूत माहिती देण्यात आली होती. चित्रप्रदर्शनाजवळच पुस्तकप्रदर्शन होते. त्यामध्ये स्थानिक भाषेबरोबरच इंग्रजी भाषेतील पुस्तके होती. महत्त्वाची बाब अशी की तिथे बऱ्यापैकी गर्दी होती. याचा अर्थ सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगातदेखील व्हिएतनामी लोकांची वाचनाची आवड अजून कायम आहे.

---

आयुष्यात काही करुन दाखवाचे असेल तर आपण काय आहोत? यापेक्षा आपण काय होऊ शकतो याचा विचार करायला हवा, जगात अशक्य काहीच नसतं.




चित्रप्रदर्शन



पुस्तकप्रदर्शन

दुसरा आणि मोठा विभाग होता तो फुलांचा. येथे फुलांची मनमोहक अशी रचना केलेली होती. एका ठिकाणी वेगवेगळ्या धान्यांचा उपयोग करून व्हिएतनाम देशाचा नकाशा बनविला होता. तो बघताना लक्षात आले की या देशाचा आकार लांबडा असून उत्तर आणि दक्षिण टोकांतील अंतर बरेच आहे. मी कुतूहलाने संदीपकडे पाहिले तेव्हा ते अंतर सुमारे मुंबई ते कोलकाता एवढे असावे असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. देशाची लांबी जरी एवढी जास्त असली तरी रुंदी मात्र फारच कमी आहे. काही ठिकाणी तर ती काही किलोमीटर एवढीच आहे. त्यामुळे एक दक्षिण-उत्तर मुख्य रस्ता त्यांना पुरेसा आहे.



**देशाचा नकाशा आणि शेजारी उभी असलेली व्हिएतनामी मुलगी**

त्या प्रदर्शनात एक अशी वस्तू होती की जिच्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले जात होते. प्रत्येक जण तिथे थांबत होता. त्यामुळे त्या वस्तूजवळ गर्दी झाली होती. कुतूहल म्हणून आम्ही पाहायला गेलो तर आम्हांला दिसले तीन धातूचे पुतळे. हे पुतळे माणसांचे नसून बोकडांचे होते. बोकडांना नववर्ष समारंभात एवढे महत्त्वाचे स्थान का असा प्रश्न आमच्या मनात उपस्थित झाला. मनात प्रश्न निर्माण झाला की तो लगेच विचारून टाकणे हा माझा स्वभाव आहे. त्यानुसार मी संदीपकडे चौकशी केली. बहुधा असा प्रश्न विचारला जाईल याची त्यांना आधीच कल्पना असावी. त्यामुळे त्यांनी उत्तरही लगेच दिले.



**बोकडांचे पुतळे**

फेब्रुवारी महिन्याच्या १९ तारखेपासून चिनी कालगणनेप्रमाणे ४०८७ व्या वर्षाची सुरुवात होत आहे. प्रत्येक नवीन वर्ष एका प्राण्याचे गुणधर्म घेऊन येते असा त्यांचा समज आहे. त्यासाठी त्यांनी १२ प्राणी निश्चित केले आहेत. येणारे वर्ष हे बोकडाचे असणार आहे. त्याची जाणीव लोकांना व्हावी यासाठी तेथे बोकडांचे पुतळे बनवून ठेवले होते. बोकडदेवतेच्या कृपेने ४०८७ वे वर्ष सुखासमाधानाचे जावो अशी मनोमन इच्छा बाळगत आम्ही घराचा रस्ता धरला.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

ज्या चांगल्या बाबी बापण निर्माण केल्या नाहीत त्या नष्ट करण्याचा अधिकार आपल्याला नाही.

# व्यक्तिवेध-४ : होर्मसजी जहांगीर भाभा

*ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा यांच्या कार्याची महती विशद करणारा लेख - संपादक*

*''मला आयुष्याकडून काय हवे आहे, हे मला अतिशय स्पष्टपणे माहीत आहे. केवळ आयुष्य आणि माझ्या भावना या दोघांबाबत मी सावध आहे. माझे आयुष्यातील सावधपणावर प्रेम आहे आणि मला तो जेवढा मिळू शकेल तेवढा हवाच आहे. मात्र आयुष्यकाळ मर्यादित असतो. मृत्यूनंतर काय, हे कुणालाही माहीत नसते. मला त्याची फिकीरही नाही. अर्थातच मी आयुष्यकाळ वाढवून त्यातील आशय वाढवू शकत नाही. मात्र मी आयुष्याची प्रखरता वाढवून त्याचा आशय वाढवेन कला, संगीत, काव्य आणि इतरही सर्व बाबतींतल्या माझ्या सावधानतेचा उद्देश, आयुष्यातील सावधानतेची प्रखरता वाढवणे हाच असतो.''*



**होमी जहांगीर भाभा**
जन्मः३० ऑक्टोबर १९०९, मुंबई
मृत्यू:२४ जानेवारी १९६६, माउंट ब्लांक

होमी जहांगीर भाभा हे बहुधा भारतीय आण्विक कार्यक्रमाचे प्रमुख शिल्पकार म्हणून ओळखले जातात. मात्र भारताच्या विकासातील त्यांची भूमिका अणुऊर्जेच्या क्षेत्राबाहेरही दूरवर पसरलेली आहे. त्यांनी दोन महान संशोधन संस्था स्थापन केल्या. त्या म्हणजे 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' आणि 'ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट, ट्रॉम्बे', जिचे भाभांच्या मृत्यूनंतर 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर' असे पुनर्नामांकन करण्यात आले होते. भारतात विजकविद्या[१] विकसित करण्यात त्यांनी कळीची भूमिका बजावलेली होती. भाभा उत्कृष्ट वैज्ञानिक आणि कुशाग्र अभियंते होते. धन-विजकां[२]च्या विजकांमुळे होणाऱ्यात विखुरणांच्या संभाव्यतेकरता त्यांनी सुयोग्य अभिव्यक्ती शोधून काढली होती. अशा विखुरण्यास नंतर भाभा-विखुरणे (भाभा-स्कॅटरिंग) असे नाव पडले. १९३७ साली प्रकाशित झालेल्या, डब्ल्यू. हिटलर[३] यांच्या सोबत त्यांनी लिहिलेल्या त्यांच्या अभिजात शोधनिबंधात अवकाशातील प्राथमिक विश्वकिरणे, वरच्या वातावरणाशी कशा प्रकारे परस्पर कार्यरत होतात ह्याचे वर्णन केलेले आहे. जमिनीच्या पातळीवरील निरीक्षणांत आढळून येणारे कण, ह्या प्रक्रियेत निर्माण होत असतात. भाभा आणि हिटलर यांनी, गॅमा किरणे आणि धन व ऋण विजक-जोड्यांच्या उतरत्या धबधब्यांमुळे विश्वकिरणवर्षाव कसा निर्माण होतो त्याचे स्पष्टीकरण दिलेले होते. १९३८ मध्ये भाभा यांनीच प्रथमतः असा निष्कर्ष काढला होता की, अशा कणांच्या गुणधर्मांची निरीक्षणे आपल्याला अल्बर्ट आइन्स्टाइन यांच्या सापेक्षता सिद्धान्ताच्या थेट प्रायोगिक प्रत्ययाप्रत नेतील.

भाभांजवळ संवेदनाक्षम आणि संस्कारित अशी सर्वोच्च दर्जाच्या कलेची देणगी होती. ज्या परिस्थितीत ते वाढले त्या परिस्थितीने हे उत्तम गुण विकसित करण्यात

त्यांना नक्कीच मदत केली. त्यांना संगीत आणि नृत्य आवडे. त्यांना भारतीय आणि पाश्चात्त्य अशा दोन्हीही संगीतांची लक्षणीय जाण होती. ते चित्रे आणि रेखाटने काढत असत. ते नाट्यनेपथ्यांचे अभिकल्पनही करत असत. ते काही सामान्य दर्जाचे वास्तुशिल्पकार नव्हते. भाभा परिपूर्णतेचे चाहते होते. ते खरेखुरे वृक्षप्रेमी होते. त्यांच्या संरक्षणार्थ जे जे करणे शक्य असेल, ते ते सर्व ते करत असत. लॉर्ड रेडक्लिफ-माऊड भाभांच्या व्यक्तिमत्त्वाच्या निरनिराळ्या पैलूंचे यथार्थ वर्णन करताना म्हणतात, ''आपलेसे वाटणारे आणि संवेदनाक्षम, भारदस्त आणि विनोदी, गतिमान आणि स्थितप्रज्ञ. मी ओळखत असलेल्या फार थोड्या लोकांपैकी भाभा एक होते (दुसरे मायनार्ड केन्स होते), जे कुठल्याही संदर्भात, जगण्याला उच्च पातळीप्रत घेऊन जात असत. होमी कमालीचे बुद्धिमान, पण दर्जाबाबत एवढे चोखंदळ होते की त्यामुळे ते कधीही निष्काळजी ठरत नसत. जे काम ते करायचे ठरवत असत ते, ते प्रेमाने काम करणारा व्यावसायिक म्हणून करत. ते अविरतपणे सजनशील होते. जीवनाच्या सर्व स्वरूपांवर ते प्रेम करत असल्यामुळे जीवनाची संपन्नता वाढवत असत. वैज्ञानिक सर्वोत्कृष्टता कलेच्या सर्वोत्तम कौशल्यासोबतही नांदू शकते आणि वंशभेद मैत्रीकरता अडथळा ठरू शकत नाही. ह्याचे ते जिते-जागते प्रतीक ठरले. जेव्हा भारतीय कलेचे अलीकडचे अखेरचे प्रदर्शन लंडनमध्ये भरले होते, तेव्हा बर्लिंग्टन हाउससमोर फलकावर लावण्याकरता जे चित्र निवडले गेले होते ते भाभांच्या चित्रांमधलेच एक होते. त्यांना चित्रांइतकेच संगीतही आवडे. पहिला एडिंबर्ग उत्सव सुरू झाला तेव्हा भारतातून विमानाने येण्याची योजकता त्यांनी दाखवली होती आणि अलीकडच्या बीथोवन क्वार्टेटचा विषय निघाला तेव्हा त्यांना ती संगीतरचना माहीत होती. एका परिषदेपाठोपाठ झालेल्या युनेस्कोच्या दुसऱ्या परिषदेत, भारतीय प्रतिनिधिमंडळातील इतर विख्यात सदस्यांमध्ये ते; शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती ह्या तिन्ही विषयांत गुणवत्ताप्राप्त जागतिक नागरिकाच्या स्वरूपात उठून दिसू लागले. परिषदेचा इतर कुठलाही भारतीय सदस्य क्वचितच तसा उठून दिसत होता. वस्तुतः त्यांना वाटते तर, ते संघटनेचे नेतृत्व करण्याकरता स्वयंसिद्ध पर्याय ठरले असते. यावरूनच त्यांचे जाणे भारतीय विज्ञान आणि संस्कृतीस किती शोकजनक ठरले याची जाणत्यांना कल्पना करता येते.''

होमी जहांगीर भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबईतील एका सधन पारशी कुटुंबात झाला होता. विद्यार्जन आणि शैक्षणिक क्षेत्रातील सेवेची, भाभांच्या कुटुंबात दीर्घ परंपरा होती. त्यांचे आजोबा - ज्यांचे नावही होमी जहांगीर भाभाच होते- म्हैसूर संस्थानातील सर-शिक्षण-निरीक्षक होते. भाभांचे वडील जहांगीर होर्मसजी भाभा यांचे शिक्षण ऑक्सफर्ड येथे झालेले होते. पुढे ते वकील झाले. त्यांची आई मेहेरन, सर दिनशॉ माणेकजी पेटिट यांची नात होती. मुंबईत सर दिनशॉ यांना, त्यांच्या लोककल्याणकारी गुणांखातर मान मिळत असे. भाभा यांच्या आत्याचा, जमशेटजी नुसरवानजी टाटा (१८३९ - १९०४) यांचे ज्येष्ठ सुपुत्र सर दोराबजी ज. टाटा (१८५९ - १९३२) यांच्याशी विवाह झालेला होता.

भाभा यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल्स या शाळांत शिक्षण घेतले. वयाच्या १५ व्या वर्षी सीनियर केंब्रिज एक्झामिनेशन उत्तीर्ण होताच त्यांनी प्रथम मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेजमध्ये आणि नंतर मुंबईतीलच रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये प्रवेश घेतला. १९२७ मध्ये भाभा केंब्रिजमधील गॉनव्हिले आणि कैअस कॉलेजमध्ये रुजू झाले. ह्याच कॉलेजात त्यांचे काका सर दोराबजी ज. टाटा यांनीही शिक्षण घेतलेले होते. पुढे त्यांनी ह्याच कॉलेजला १९२० मध्ये पंचवीस हजार पौंडांची देणगीही दिलेली होती. भाभा यांनी १९३० ची मेकॅनिकल सायन्सेस ट्रायपॉस परीक्षा दिली. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, भाभा यांचे वडील तसेच काका सर दोराबजी ज. टाटा या दोघांनाही भाभा हे इंजीनियर व्हावेत असे वाटत

असे, ज्यामुळे अंतिमतः ते जमशेटपूरमधील टाटा आयर्न अँड स्टील या कंपनीत रुजू होऊ शकले असते.

केंब्रिजमध्ये असताना भाभा यांचे स्वारस्य हळूहळू सैद्धान्तिक भौतिकशास्त्राकडे वळत होते. १९२८ मध्ये वडलांना लिहिलेल्या पत्रात भाभा लिहितात, ''मी अतिशय गांभीर्याने तुम्हांला हे सांगतो आहे की व्यवसाय करणे अथवा इंजीनियर म्हणून नोकरी करणे हे माझ्याकरता नाही. हे माझ्या स्वभावास पूर्णतः परके आणि माझ्या मतांत व वृत्तीत न बसणारे आहे. भौतिकशास्त्र ही माझी दिशा आहे. मला माहीत आहे की इथे मी काहीतरी महान असे करू शकेन. प्रत्येक माणूस केवळ त्याच एका विषयात सर्वोत्तम कर्तबगारी दाखवू शकतो, सर्वोत्तम ठरू शकतो, ज्याचे त्याला वेड असते, ज्यावर त्याचा अतूट विश्वास असतो जसा माझाही आहे, आणि जे साध्य करण्याचे सामर्थ्य त्याच्यापाशी असते. वस्तुतः त्याचा जन्मच ते करण्यासाठी झालेला असतो. तो ते साध्य करेलच असे विधिलिखित असते. तसाच भौतिकशास्त्राचा अभ्यास करावा ह्या इच्छेने मी प्रेरित झालेलो आहे. कधीतरी मला ते करायचेच आहे आणि मी ते नक्कीच करेन. माझे केवळ हेच एक ध्येय आहे. एखाद्या मोठ्या पेढीचा प्रमुख व्हावे किंवा 'यशस्वी' माणूस व्हावे अशी आकांक्षा मला नाही. ज्यांना ते आवडते असे बुद्धिमान लोक अनेक आहेत, त्यांना ते करू द्यावे. विज्ञानाचा धिक्कार करायचीही ज्यांना फिकीर नव्हती त्या बीथोव्हन ह्यांना 'तुम्ही वैज्ञानिक व्हा, ते फार महान काम असते' असे सांगून काय उपयोग? तसेच 'अभियंते व्हा, ते बुद्धिवंतांचे काम असते' असे सॉक्रेटिस यांना सांगून काय उपयोग? त्यांच्या ते स्वभावातच नाही. म्हणून मी तुम्हांला अत्यंत प्रामाणिकपणे सुचवतो की मला भौतिकशास्त्र अभ्यासू द्या.''

भौतिकशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी ते गणित-ट्रायपॉस करू इच्छित होते. भाभांच्या वडिलांना त्यांच्या अतूट निर्धारामुळे सौम्य व्हावे लागले. तरीही त्यांनी एक अट घातली. त्यांनी होमीस सांगितले की, त्याने जर मेकॅनिकल-ट्रायपॉस यशस्वीरीत्या साध्य केली तर ते त्याला केंब्रिज येथे राहू देतील आणि गणित-ट्रायपॉस करू देतील. म्हणून जेव्हा भाभा यांनी मेकॅनिकल-ट्रायपॉस प्रथम वर्गात उत्तीर्ण केली तेव्हा त्यांच्या वडलांनी त्यांना त्यांची इच्छा पूर्ण करू दिली. अशा प्रकारे दोन वर्षांनंतर भाभांनी गणित-ट्रायपॉसही प्रथम वर्गात उत्तीर्ण केली.

भाभा यांना पॉल अॅड्रिअन डिरॅक (१९०२-८४) हे शिकवत असत. ते केंब्रिजमधील लुकाशिअन प्रोफेसर ऑफ मॅथेमॅटिक्स होते (१९३२-६९) आणि त्यांना पुंज-सिद्धान्तावरील त्यांच्या कामाखातर, १९३३ सालचे भौतिकशास्त्रातले नोबेल पारितोषिक, इर्विन श्रॉडिंजर (१८८७-१९६१) यांच्या सोबतीने देण्यात आलेले होते. मग भाभा कॅव्हेंडिश प्रयोगशाळेत रुजू झाले, जिथून त्यांनी सैद्धान्तिक भौतिकशास्त्रात पी.एचडी. पदवी प्राप्त केली. १९३२ ते १९३४ दरम्यान त्यांना गणितातील राऊज बॉल ट्रॅव्हलिंग स्कॉलरशिप मिळत होती. याशिवाय १९३१-१९३२ दरम्यान त्यांना सॅलोमन्स-स्टुडंटशिप-इन-इंजीनिअरिंगही मिळत असे. त्यांनी युरोपात प्रवास करून, वुल्फगाँग पाउली (१९००-५८) यांच्यासोबत झुरिचमध्ये आणि एन्रिको फर्मी (१९०१-५४) यांचेसोबत रोममध्ये काम केले. त्यांचा पहिला शोधनिबंध १९३३ साली प्रकाशित झाला. त्यामुळे त्यांना १९३४ मध्ये आयझॅक न्यूटन स्टुडंटशिप मिळाली. ती त्यांना पुढे तीन वर्षांपर्यंत मिळत होती. त्यादरम्यान ते बहुधा केंब्रिजमध्येच काम करत होते. थोडासा काळ कोपेनहेगन येथे त्यांनी नील्स हेन्रिक डेव्हिड बोहर (१८८५-१९६२) यांच्यासोबत काम केले त्याचाच काय तो अपवाद.

जेव्हा भाभा कॅव्हेंडिश प्रयोगशाळेत काम करत होते त्यादरम्यानच अनेक खळबळजनक शोध लागले. १९३२ मध्ये जेम्स चॅडविक (१८९१-१९७४) ह्यांनी विरक्तका[४]चे अस्तित्व दाखवून दिले, जॉन डग्लस कॉक्राफ्ट (१८९७-१९६७) आणि अर्नेस्ट थॉमस सिंटन वॉल्टन (१९०३-९५) यांनी उच्च-गती प्रकाशकण[५]

धडकवून, परस्पर-स्वभावांतरण[६] किंवा हलक्या मूलद्रव्यांचे विघटन कृत्रिमरीत्या घडवून आणले; आणि पॅट्रिक मायनार्ड स्टुअर्ट ब्लॅकेट्ट (१८९७-१९७४) आणि गिऊस्पे पावलो स्टॅनिस्लाओ ऑच्चिआलिनी (१९०७) मेघ-कक्ष[७] प्रकाशचित्रांद्वारे गॅमा-प्रारणांद्वारे घडून येणाऱ्या मूलक-जोड्या[८] आणि वर्षाव (शॉवर) निर्मिती दाखवून दिली.

केंब्रिजमध्ये भाभा यांचे काम मुख्यतः विश्वकिरणां[९] भोवतीच होत राहिले. इथे ह्याची दखल घ्यावी लागेल की एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस, बाह्य अवकाशातून येणाऱ्या भेदक (पेनेट्रेटिंग) प्रारणांचे अस्तित्व, चार्ल्स थॉमसन रीस विल्सन (१८६९-१९५९) यांनी केलेल्या विद्युत्-दर्शक-यंत्रांसहितच्या साध्या प्रयोगांतून संवेदले गेले. रॉबर्ट अँड्रयूज मिलिकन (१८६८-१९६३) या अमेरिकन, नोबेल विजेत्या भौतिकशास्त्रज्ञाने, अतिशय ऊर्जस्वल भारित कणांच्या ह्या प्रारणांना 'विश्वकिरण' हे नाव दिले. त्यांत निरनिराळ्या प्रकारची अणुकेंद्रके असतात, मात्र मुख्यत्वे धनक असतात. प्राथमिक विश्वकिरण वातावरणाशी परस्पर-कार्यरत होऊन दुय्यम किरणे निर्माण करतात.

पूर्वीच उल्लेख केल्यानुसार भाभा यांनी डब्ल्यू. हिटलर यांच्या सहयोगाने १९३७ साली प्रकाशित एका शोधनिबंधात विश्वकिरण वर्षावाच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले. त्याआधी विश्वकिरण वर्षावाच्या निर्मितीकरता जबाबदार असलेल्या घडामोडींबाबत (मेकॅनिझम) खूप निरनिराळे अंदाज बांधले जात असत. केंब्रिज येथे काम करत असताना भाभा यांनी दिलेले महत्त्वाचे योगदान, जी. वेंकटरामन ह्यांनी, त्यांच्या युनिव्हर्सिटी प्रेस, हैद्राबादद्वारा १९९४ मध्ये प्रकाशित झालेल्या, 'भाभा अँड हिज मॅग्निफिकंट ऑब्सेशन', या पुस्तकात, पुढीलप्रमाणे सांगितलेले आहे. सापेक्ष-विनिमय-विखुरणाचे (रिलेटिव्हिस्टिक-एक्सचेंज-स्कॅटरिंग अथवा भाभा विखुरणाचे) स्पष्टीकरणः

१. विश्वकिरणांतील विजक आणि धन-विजक वर्षावांची निर्मिती (भाभा-हिटलर सिद्धान्त).
२. युकावा-कणाचे अनुमान, ज्याला त्यांनी 'मेसॉन' हे नाव सुचवले.
३. मेसॉन ऱ्हासात सापेक्ष-काळ-विस्तार (रिलेटिव्हिस्टिक-टाइम-डायलेशन) प्रभावांचे भाकीत.

१९५० सालचे भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळवणाऱ्या सेसिल फ्रँक पॉवेल (१९०३-१९६९) यांनी भाभा यांच्या संशोधनकार्याचे महत्त्व लिहून ठेवले आहे. ते म्हणतात, ''विद्युत्चुंबकीय परिभाषेत, विश्वकिरणवर्षाव कसे विकसित होतात याबाबतचे आपले आकलन घडवण्यात भाभा यांचा निर्णायक वाटा आहे. त्या काळी गट-सिद्धान्त-पद्धतीनेच केवळ ज्यांचे अस्तित्व ज्ञात होते, अशा प्राथमिक कणांबाबतचे स्पष्टीकरण देण्याच्या भाभा यांच्या प्रयत्नांबद्दलही ते त्या काळी विख्यात होते. गेल आणि इतरांनी पुढे सारख्याच उद्दिष्टांकरता वापरलेल्या पद्धती वापरणाऱ्यांत, ते अग्रणी होते. माझे मित्र लिओपोल्ड इन्फेल्ड म्हणतात की, भाभा हे एक प्रतिष्ठित (डिस्टिंग्विश्ड) आणि भारदस्त (एलेगंट) तत्त्वज्ञ होते आणि त्यांचे शोधनिबंध नेहमीच उत्तम अभिरुचीने लिहिलेले असत.''

प्राथमिक कणांच्या एका वर्गाकरताच वापरले जाणारे 'मेसॉन' हे नाव भाभा यांनीच सुचवलेले होते. जेव्हा कार्ल डेव्हिड अँडरसन (१९०५-९१) यांनी, विश्वकिरणांत आढळून येणारा आणि विजक व धनक यांच्यादरम्यानचे वस्तुमान असणारा एक नवा कण शोधून काढला होता, तेव्हा त्यांनी त्याला 'मेसॉटॉन' असे नाव दिले होते. पुढे, बहुधा मिलिकन यांच्या सल्ल्यावरून, त्यांनी ते 'मेसॉट्रॉन' असे बदलले. भाभा यांनी 'नेचर' ला पाठवलेल्या एका छोट्याशा नोंदीत (फेब्रुवारी १९३९), त्याकरता 'मेसॉन' हे नाव सुचवले. ते लिहितात, ''अँडरसन आणि नेड्डरमेयर यांनी, विश्वप्रारणांत विजक

नियमितपना हा माणसाचा मित्र, तर आळस हा त्याचा कट्टर शत्रू असतो.

आणि धनक यांदरम्यानचे वस्तुमान असणारा जो एक नवा कण आढळून आलेला आहे, त्यास 'मेसॉट्रॉन' हे नाव सुचवलेले आहे. असे वाटते की त्या शब्दातील ट्र अनावश्यक आहे. कारण मुळातील ग्रीक शब्द 'मेसो' म्हणजे मधला ह्यात ट्र नाही. न्यूट्रॉन आणि इलेक्ट्रॉन ह्यांच्यातील ट्र, अर्थातच त्यांच्या मूळ शब्दांतील म्हणजे 'न्यूट्र' आणि 'इलेक्ट' ह्यांच्यातून आलेला आहे. ..... त्यामुळे तार्किक दृष्ट्या आणि लहान होत असल्यामुळेही नव्या कणास 'मेसॉट्रॉन' ऐवजी 'मेसॉन' असेच म्हणावे.'' अँडरसन यांचा कण (म्यु-मेसॉन), प्रथमतः हिडेकी युकावा (१९०७-८१) यांनी भाकीत केलेला आणि सशक्त आण्विक बल धारण करणारा व अणुगर्भास एकत्र बांधून ठेवणारा कण मानला जाई. मात्र, नंतर जेव्हा त्याची अणुगर्भकांसोबतची परस्परक्रिया खूपच तुरळक असल्याचे आढळून आले तेव्हा युकावा यांनी सुचवलेल्याप्रमाणे त्याची 'एकत्र बांधून ठेवणारा कण' अशी भूमिका असण्याबाबत शंका उपस्थित झाली. १९४७ मध्ये सी. एफ. पॉवेल यांनी जेव्हा वैश्विक प्रारणांतील, विजकाच्या २६४ पट वस्तुमान असणारा एक कण (पाय-मेसॉन किंवा पायॉन) पुन्हा शोधून काढला तेव्हा हा पेच सुटला. पायॉन अणुगर्भकांसोबत खूप जोरदारपणे परस्पर कार्यरत होई आणि अगदी नेमकेपणे युकावांनी भाकीत केलेल्या भूमिकेत बसे. म्यु-मेसॉन किंवा म्युऑन हा पाय-मेसॉनची ऱ्हास-निष्पत्ती होता.

१९३९ मध्ये जेव्हा दुसरे महायुद्ध सुरू झाले, त्या वेळी भाभा भारतात होते. एका छोट्याशा सुट्टीवर ते आलेले होते. मात्र युद्धामुळे त्यांची योजना बदलली. इंग्लंडमधील बहुतेक शास्त्रज्ञांना युद्धकालीन कामांत भाग घ्यावा लागला आणि त्यामुळे मूलभूत संशोधनास वाव राहिला नव्हता. म्हणून केंब्रिज येथील संशोधनाचे काम करण्याकरता पुन्हा इंग्लंडला परतण्याची आपली योजना भाभांना सोडून द्यावी लागली. इथे हे लक्षात घ्यावे लागेल की प्रशांतचंद्र महालनोबिस (१८९३-१९७२) यांनी फिजिक्स ट्रायपॉस उत्तीर्ण केल्यावर, कॅव्हेंडिश प्रयोगशाळेत, मेघ-कक्षाचे शोधकर्ते सी.टी.आर.विल्सन यांच्यासोबत काम करण्याची व्यवस्था केलेली होती. मग ते थोड्याशा सुट्टीकरता भारतात परतले होते. त्यानंतर पहिले महायुद्ध सुरू झाल्यामुळे मग तेही परत जाऊ शकले नव्हते. १९४० मध्ये भाभा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोरमध्ये सैद्धान्तिक भौतिकशास्त्राचे प्रपाठक (रिडर) म्हणून रुजू झाले. हे पद त्यांच्याकरताच विशेषरूपाने निर्माण केले गेले होते. तिथे चंद्रशेखर व्यंकट रमण (१८८८-१९७०) हे संचालक होते. १९४४ मध्ये भाभा यांना प्राध्यापक करून घेण्यात आले. भाभा तिथे असताना विक्रम साराभाई (१९१९-७१) यांनीसुद्धा काही काळ तिथे व्यतीत केलेला होता. तिथे भाभा यांनी विश्वकिरणांवरील संशोधनाचे मार्गदर्शन केले. त्यांनी तिथे, विश्वकिरणांवरील संशोधनाच्या प्रायोगिक आणि सैद्धान्तिक भौतिकशास्त्रविषयक पैलूंवर संशोधन करणारा तरुण संशोधकांचा एक गटच संघटित केला होता. भारतात काही वर्षे घालवल्यावर मग इंग्लंडला परतण्यात भाभांना स्वारस्य राहिले नाही. बहुधा मातृभूमीबद्दलच्या जबाबदारीची वाढती जाणीव होऊ लागल्यामुळे हे घडले असेल. सावकाशपणे त्यांची अशी खातरी पटली की आघाडीच्या वैज्ञानिक ज्ञानावर संशोधन करणारे गट उभे करणे हे त्यांचे कर्तव्यच आहे. २० एप्रिल १९४४ रोजी त्यांनी सुब्रमण्यम् चंद्रशेखर (१९१०-९५) यांना लिहिलेल्या पत्रात असे लिहिले की, ''... पुरेसा सन्मान आणि आर्थिक पाठबळ मिळत असेल तर, देशातच राहून, इतर सुदैवी देशांत असलेल्या शैक्षणिक संस्थांच्या तुलबळ संस्था, देशातच उभ्या करणे हे एखाद्याचे कर्तव्यच ठरायला हवे, ह्या दृष्टिकोनाप्रत मी पोहोचलो आहे.''

१९४० च्या सुरुवातीस भाभा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोरमध्ये काम करत होते. त्या वेळी. आण्विक भौतिकशास्त्र, विश्वकिरणे, उच्च ऊर्जा भौतिकशास्त्र आणि भौतिकशास्त्रातील इतर आघाडीच्या

ज्ञानशाखांवर मौलिक काम करण्याकरता आवश्यक असणाऱ्या सोयी उपलब्ध असलेली एकही संस्था देशात अस्तित्वात नव्हती. म्हणून, त्यांनी मार्च १९४४ मध्ये सर दोराबजी जे. टाटा ट्रस्टला, 'मूलभूत भौतिकशास्त्रात झपाट्याने काम करणारी एक संशोधन संस्था' निर्माण करण्याकरता, एक प्रस्ताव दिला. त्यात त्यांनी लिहिले की, ''भारतात आजमितीस सैद्धान्तिक आणि प्रायोगिक अशा दोन्हीही भौतिकशास्त्रातील मूलभूत समस्यांवर काम करणारी एकही मोठी संशोधन संस्था अस्तित्वात नाही. मात्र सक्षम माणसे भारतभर विखुरलेली आहेत. एका जागी राहून, योग्य त्या दिशेने प्रेरित केल्यास करू शकतील असे काम मात्र, ती माणसे आज करू शकत नाही. म्हणून हे भारताच्या निखळ हिताचे आहे की, भारतात मूलभूत भौतिकशास्त्रात झपाट्याने काम करणारी एक संशोधन संस्था असावी. कारण अशी संस्था भौतिकशास्त्राच्या केवळ अप्रगत शाखांतच संशोधनाचे नेतृत्व करेल असे नसून, उद्योगांतील निकडीच्या व्यावहारिक उपायोजनांच्या समस्यांतही संशोधनाचे नेतृत्व करेल. जर भारतात आज होत असलेले बहुतांशी उपायोजित संशोधन हे असमाधानकारक असले किंवा निकृष्ट दर्जाचे असले, तरी ते पूर्णतः, पुरेशा संख्येत मूलभूत संशोधक अस्तित्वात नसण्यामुळे घडते आहे. असे संशोधक चांगल्या संशोधनाचे मानदंड तयार करतील आणि संचालक मंडळांवर सल्लागार म्हणून काम करतील. याशिवाय, आजपासून आणखी सुमारे वीस वर्षांनी, जेव्हा आण्विक ऊर्जा वीजनिर्मितीकरता यशस्वीरीत्या उपायोजित झालेली असेल, तेव्हा भारतास तज्ज्ञांकरता इतरत्र शोध घ्यावा लागणार नाही, तर ते हाताशी उपलब्ध असतील. मला असे वाटत नाही की, इतर देशांतील विज्ञानाच्या विकासाशी परिचित असलेली कुठलीही व्यक्ती, मी प्रस्तुत करत आहे तशा संस्थेची भारतास गरज असल्याचे नाकारेल.

''ज्या विषयांवर संशोधन आणि प्रगत शिक्षण व्हावयाचे आहे ते असतील, सैद्धान्तिक भौतिकशास्त्र - विशेषतः मूलभूत समस्यांवर-, विश्वकिरणे, आण्विक भौतिकशास्त्र आणि विश्वकिरणांवरील प्रायोगिक संशोधन. आण्विक भौतिकशास्त्र विश्वकिरणांपासून निराळे करणे शक्यही नाही आणि वांछनीयही नाही, कारण सैद्धान्तिकदृष्ट्या दोन्हीही निकट संबंधित आहेत.''

सर दोराबजी जे. टाटा ट्रस्टच्या ट्रस्टींनी भाभांचा प्रस्ताव आणि तशी संस्था सुरू करण्याची आर्थिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय एप्रिल १९४४ मध्ये घेतला. मुंबई (त्या वेळची बॉम्बे) ही जागा प्रस्तावित संस्थेकरता निवडण्यात आली कारण त्या वेळच्या 'गव्हर्न्मेंट ऑफ बॉम्बे' ने संयुक्तरीत्या संस्थेच्या स्थापनेकरता स्वारस्य दाखवले होते. अशा प्रकारे टाटा 'इंन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' चे उद्घाटन १९४५ मध्ये एका अस्तित्वात असलेल्या इमारतीतील भाड्याने घेतलेल्या ५४० वर्ग मीटर जागेत करण्यात आले. १९४८ मध्ये रॉयल यॉच क्लबच्या जुन्या इमारतींत ही संस्था हलवण्यात आली. संस्थेच्या हल्लीच्या इमारतीचे उद्घाटन पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते जानेवारी १९६२ मध्ये झाले. त्याआधी नेहरूंनीच संस्थेचा पाया १९५४ मध्ये घातलेला होता. १९६२ मध्ये ह्या इमारतीचे उद्घाटन करताना नेहरू म्हणाले होते की, ''सामान्यतः ह्यासारखी इमारत बांधून पूर्ण होण्यास आठ वर्षांचा विलंब लागावा हे जरा जास्तच वाटते. मात्र मध्ये एकदा आलो तेव्हा आणि आत्ता ह्या इमारतीस अंशतः भेट दिल्यावर, यावर टीका करण्याची माझी मूळ भावना काहीशी बदलली, कारण ज्या प्रकारे ते साध्य करण्यात आलेले आहे त्याकरता प्रचंड प्रमाणात प्रयास केला गेलेला दिसत आहे. अडचणी आलेल्या आहेत, तरीही जे साध्य झालेले आहे ते खूपच मूल्यवान आहे.''

ह्या संस्थेस दुसऱ्या वर्षापासून, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन-परिषद आणि नैसर्गिक व वैज्ञानिक संशोधन विभाग यांच्याद्वारा भारत सरकारचे आर्थिक पाठबळ लाभले. आज संस्थेस प्रमुख आर्थिक पाठबळ

अणुऊर्जा विभागाद्वारे भारत सरकारच देत आहे. इथे हे अधोरेखित करायला हवे आहे की, 'टाटा इंस्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'च्या भावी विकासाकरता कुठलाही संघटनात्मक आराखडा बनवला गेलेला नव्हता. भाभा यांनी प्रथम योग्य ती माणसे निवडली आणि मग त्यांना विकासाची संधी दिली गेली. याच प्रकारचे तत्त्व कैसर विल्हेल्म समाजाने, जर्मनीत मॅक्स प्लँक इन्स्टिट्यूटची इमारत बांधताना अवलंबले होते. ''कैसर विल्हेल्म समाज, प्रथम संशोधन संस्था उभारणार आणि मग त्याकरता योग्य अशी माणसे हुडकणार, असे करणार नाही. तर प्रथम असामान्य माणूस हुडकेल आणि मग त्याच्याकरता संस्था उभी करेल.'' या संदर्भात भाभांनी भारतीय राष्ट्रीय विज्ञान संस्थे (जिला पुढे भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी असे नाव दिले गेले) च्या वार्षिक सभेत भाषण करताना ऑक्टोबर १९६३ मध्ये पुढील निरीक्षणे नोंदवली होती. ते म्हणाले, ''मला असे वाटते की, सरकारी हुकुमाने वैज्ञानिक संस्था निर्माण होऊ शकतात यावर भारतात आपण विश्वास ठेवू शकतो. वैज्ञानिक संस्था, मग ती प्रयोगशाळा असो वा अकादमी, ती एखाद्या वृक्षाप्रमाणेच खूप काळजीपूर्वक वाढवावी लागते. दर्जा आणि साध्ये यांबाबत तिची वाढ केवळ खूप मर्यादित प्रमाणातच त्वरित करता येते. हे असे क्षेत्र आहे ज्यात खूप मोठ्या संख्येतील मध्यम अथवा दुय्यम दर्जाचे कार्यकर्ते, असामान्य माणसांची उणीव भरून काढू शकत नाहीत आणि काही असामान्य माणसे विकसित होण्याकरता १०-१२ वर्षे सहज घेऊ शकतात.

''आपल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांपैकी बऱ्याच प्रयोगशाळा ज्या क्षेत्रांत त्यांनी काम करावयाचे आहे ते क्षेत्र निश्चित करून, मग विदेशातील काही संबंधित मोठ्या प्रयोगशाळांचा तर्जुमा समोर ठेवून, त्यांचा संघटनात्मक तक्ता तयार करून, निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यात मग असे आपसूकच गृहीत धरण्यात आलेले आहे की, त्या तक्त्यानुसार आवश्यक ती पदे जाहिराती देऊन भरली जाऊ शकतात. योग्य त्या उच्च दर्जाचे कार्यकर्ते भारतात उपलब्धच नाहीत किंवा कुठल्यातरी दुसऱ्या संस्थेतूनच मिळवावे लागतील व तसे केल्यास त्या संस्था कमजोर होतील, ह्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले जाते. आपली विद्यापीठे नेहमीच कमजोर राहत आलेली आहेत. ह्या बाबतीत ती आणखीनच कमजोर झालेली आहेत.''

अणुऊर्जेतील संशोधन संघटित करण्यातील पहिली पायरी होती बोर्ड ऑफ रिसर्च इन अ‍ॅटॉमिक एनर्जीची निर्मिती. ते बोर्ड, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचा एक भाग होते आणि भाभा त्याचे अध्यक्ष होते. सरकारचा एक संपूर्ण विभाग, अशा स्वरूपात 'डिपार्टमेंट ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च'चा प्रस्ताव करताना, शांतिस्वरूप भटनागर (१८८४-१९५५) यांनी असा प्रस्ताव केलेला होता की 'बोर्ड ऑफ रिसर्च इन अ‍ॅटॉमिक एनर्जी'ला ह्या नव्या विभागात हलवण्यात यावे. मात्र भाभांच्या स्वतःच्या अशा कल्पना होत्या. त्यांना असे वाटे की अणुऊर्जा-कार्यक्रमास ह्या नव्या विभागातून बाहेर ठेवावे. २६ एप्रिल १९४८ रोजी भाभा यांनी भारताचे तत्कालीन पंतप्रधान असलेल्या जवाहरलाल नेहरू यांना, 'भारतातील अणुसंशोधनाचे संघटन' या शीर्षकाचे एक टिपण पाठवले. त्यात भाभा यांनी असे लिहिले की, ''अणुऊर्जेचा विकास एका खूप लहान आणि उच्चाधिकारप्राप्त यंत्रणेवर सोपवावा, जिच्यात असे म्हणू या की तीन कार्यकारी अधिकार असलेल्या व्यक्ती असतील; ज्यांचे उत्तरदायित्व कुठल्याही मध्यस्थ दुव्याखेरीज थेट नेहरूंशी असेल. थोडक्यात ह्या यंत्रणेस 'अणू-ऊर्जा-आयोग' असेही संबोधले जाऊ शकेल.'' भाभांनी ह्या गोष्टीवर भर दिला की 'अणू-ऊर्जा-आयोगा'चे स्वतःचे असे सचिवालय असावे. मंत्रिमंडळाच्या अथवा सरकारच्या इतर कुठल्याही विभागाच्या सचिवालयापासून, अगदी प्रस्तावित 'डिपार्टमेंट ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च'च्या सचिवालयापासूनही स्वतंत्र. त्यांनी असेही सुचवले की,

एकदा का 'अणू-ऊर्जा-आयोग' नियुक्त झाली की मग अस्तित्वात असलेल्या 'बोर्ड ऑफ रिसर्च इन ॲटॉमिक एनर्जी' चे विसर्जन करावे. काही महिन्यांतच सरकारने भाभा यांचा प्रस्ताव स्वीकारला आणि इंडियन ॲटॉमिक एनर्जी ॲक्ट-१९४८ अस्तित्वात आल्यानंतर ऑगस्ट १९४८ मध्ये 'अणू-ऊर्जा-आयोग' निर्माण झाला. त्याचा कार्यभाग खालीलप्रमाणे होता.

१. वेळोवेळी, आवश्यकतेनुरूप, देशाच्या अणुऊर्जेसंदर्भातील स्वारस्याची अभिव्यक्ती ठरतील अशा पायऱ्यांनी, भारत सरकारला इंडियन ॲटॉमिक एनर्जी ऍक्ट-१९४८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारावर अंमलबजावणी करणे.

२. भारतीय आधिपत्याखालील प्रदेशांचे सर्वेक्षण करून अणुऊर्जेसंबंधित उपयुक्त खनिजांची जागा निश्चित करणे, आणि

३. अस्तित्वात असलेल्या संस्था व विद्यापीठे यांतून अशा प्रकारच्या संशोधनास उत्तेजन आणि अनुदान देणे. भारतीय विद्यापीठांत आण्विक भौतिकशास्त्रातील प्रशिक्षण आणि संशोधन सुविधा वाढवण्याकरता विशेष पावले उचलली जातील हे पाहणे.

पहिल्या अणू-ऊर्जा-आयोगात भाभा अध्यक्ष होते. त्यांच्याखेरीज इतर दोन सदस्य होते शांतिस्वरूप भटनागर आणि करिआमनिक्कम श्रीनिवास कृष्णन् (१८९८-१९६१). भारताचा आण्विक कार्यक्रम भक्कम पायावर उभा करण्याकरता भाभांना आवश्यक वाटणाऱ्या तीन गोष्टी पुढीलप्रमाणे होत्या.

१. नैसर्गिक संसाधनांचे, विशेषतः अणुऊर्जा कार्यक्रमाचे स्वारस्य असलेल्या; युरेनियम, थोरियम, बेरेलियम, ग्रॅफाई इत्यादी पदार्थांचे सर्वेक्षण करणे. हे साध्य करण्याकरता एक विशेष एकक 'रेअर मिनरल्स डिव्हिजन' या नावाने दिल्लीत, दाराशॉ नौशेरवान वाडिया (१८८३-१९६९) यांच्या मदतीने, स्थापन करण्यात आले.

२. मूलभूत विज्ञानातील, विशेषतः भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या विषयांतील, सशक्त संशोधन संस्थांचा, त्यांना सुविधा आणि उच्च दर्जाचे संशोधक-शास्त्रज्ञ पुरवून विकास घडवून आणणे.

३. उपकरणाच्या, विशेषतः विजकविद्येतील उपकरणाच्या कार्यक्रमाचा विकास घडवून आणणे. विजकविद्या-उत्पादने-एकक या नावाचे एक एकक टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये निर्माण करण्यात आले. हेच एकक पुढे, भारतीय-विजकविद्या-परिषद-मर्यादित, हैदराबाद या नावाने प्रसिद्ध झालेल्या एका मोठ्या परिषदेचे बीज झाले.

जेव्हा भाभा यांना असे लक्षात आले की, अणुऊर्जा कार्यक्रमाकरताचा तंत्रविकास इतःपर टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चमध्ये सुरू ठेवणे शक्य राहणार नाही, तेव्हा त्यांनी असा निर्णय घेतला की केवळ या उद्दिष्टाकरताच वाहिलेली एक नवी प्रयोगशाळा उभारली जावी. त्यांनी याकरता मुंबईनजीक, ट्रॉम्बेजवळ १,२०० एकर जमीन मिळवली. अशा प्रकारे ॲटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट १९५४ पासून सुरू झाली. याच वर्षी अणुऊर्जा विभागही सुरू झालेला होता.

१९४१ मध्ये भाभा यांची रॉयल सोसायटीचे फेलो म्हणून निवड झाली. १९४३ मध्ये त्यांना केंब्रिज विद्यापीठाने त्यांच्या विश्वकिरणांवरील कामाखातर ॲडम्स प्राइझ दिले आणि १९४८ मध्ये केंब्रिज फिलॉसॉफिकल सोसायटीचे हॉपकिन्स प्राइझही दिले. १९६३ मध्ये त्यांची यू.एस.अकॅडमी ऑफ सायन्सेसचे फॉरैन असोसिएट म्हणून, तसेच न्यूयॉर्क अकॅडमी ऑफ सायन्सेसचे सन्माननीय आजीव सदस्य म्हणूनही निवड झाली. १९६४ मध्ये ते 'रॉयल अकॅडमी ऑफ सायन्सेस,

माद्रिद' चे फॉरेन करस्पाँडिंग अॅकॅडमीशियन नेमले गेले. १९६० पासून १९६४ पर्यंत ते इंटरनॅशनल युनियन ऑफ प्युअर अँड अप्लाइड फिजिक्सचे प्रेसिडेंट होते. संयुक्त राष्ट्रांच्या विद्यमाने ऑगस्ट १९५५ मध्ये जिनिव्हा येथे झालेल्या ऐतिहासिक अणुऊर्जेच्या शांतिपूर्ण उपयोगांवरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे ते अध्यक्ष होते. १९६३ साली ते भारतातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेसचे अध्यक्ष होते. याशिवाय ते १९५१ मध्ये इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशनचे अध्यक्ष होते. भारत सरकारने १९५४ साली त्यांना पद्मभूषण हा किताब दिला.

आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा अडतीच्या वैज्ञानिक सल्लागार समितीच्या सभेस हजर राहण्याकरता व्हिएन्ना येथे जात असता, आल्प्स पर्वताच्या विख्यात माउंट ब्लांक शिखरानजीक झालेल्या विमान अपघातात, २४ जानेवारी १९६६ रोजी त्यांचा मृत्यू झाला. त्या वेळी ते टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचे संचालक आणि सैद्धांतिक भौतिकशास्त्राचे प्राध्यापक होते, भारत सरकारचे अणुऊर्जा विभागातील सचिव होते, अणुऊर्जा आयोगाचे पदसिद्ध अध्यक्ष होते आणि अॅटॉमिक एनर्जी एस्टॅब्लिशमेंट ट्रॉम्बेचे संचालकही होते. भाभा यांच्या आयुष्याचा वेध घेणाऱ्या, बहुधा रूपरेषात्मक आणि सुघटित नसलेल्या ह्या लेखाचा समारोप भाभांबद्दल जे.आर.डी.टाटा यांनी काढलेल्या पुढील उद्गारांनी करणेच लेखकास आवडेल. ते उद्गार असे आहेत : ''वैज्ञानिक, अभियंता, सिद्धहस्त निर्माता आणि प्रशासक, तसेच मानवी कलाकौशल्यांत व संगीतात उत्तुंग उंची गाठलेले होमी, हे एक खरेखुरे परिपूर्ण पुरुष होते.''

हा लेख, http://www.vigyanprasar.gov.in/scientists/bhabha/BHABHANEW.HTM ह्या दुव्यावरील डॉ. सुबोध महन्ती ह्यांनी मूळ इंग्रजीत लिहिलेल्या, होमी जहांगीर भाभा ह्या लेखाचा नरेंद्र गोळे ह्यांनी केलेला मराठी अनुवाद आहे.

[१]विजेचा कण म्हणजे 'विजक'. त्या विजकाचे शास्त्र म्हणजे विजकविद्या. इंग्रजीत इलेक्ट्रॉनिक्स.

[२]धन विद्युतभार असलेला, विजकाइतक्याच वस्तुमानाचा कण. धन-विजक. इंग्रजीत पॉझिट्रॉन.

[३]वॉल्टर हेन्रिच हिटलर (२ जानेवारी १९०४ ते १५ नोव्हेंबर १९८१) हे भाभा यांचे गुरू व मार्गदर्शक होते.

[४]पदार्थास विरक्तच ठेवणारे जे अण्वंतर्गत कण असतात ते 'विरक्तक'. इंग्रजीत न्यूट्रॉन.

[५]प्रकाशाचा कण म्हणजे प्रकाशकण. इंग्रजीत फोटॉन.

[६]एका मूलद्रव्यापासून दुसरे मूलद्रव्य निर्माण होण्याची प्रक्रिया. इंग्रजीत म्युटेशन.

[७]इंग्रजीत क्लाउड-चेंबर.

[८]पदार्थास धन किंवा ऋण करणाऱ्या अण्वंतर्गत कणांस अनुक्रमे 'धनक' (प्रोटॉन) किंवा 'ऋणक' (इलेक्ट्रॉन) म्हणतात. उदासीन अणूतून एक विजक किंवा ऋणक निघून गेल्यावर, उरतो उर्वरित वस्तुमानाचा धनभारित अणू. हा पदार्थाचा मूल कण, या नात्याने 'मूलक'(आयॉन) म्हणून ओळखला जातो. विजकासही याच अर्थाने मूलक मानता येते. धनक व विजक मिळून विरक्तक तयार होतो. म्हणून विरक्तकास मात्र पदार्थाचा मूलक किंवा मूल कण म्हणता येत नाही. मात्र, त्याचे वस्तुमान धनक व विरक्तक या दोन्हींच्या संयुक्त वस्तुमानापेक्षा काहीसे कमीच असते. विजक सुटा होऊन उर्वरित वस्तुमानाचा धनभारित अणू निर्माण झाल्यास, म्हणूनच एक मूलक-जोडी निर्माण होत असते. इंग्रजीत आयॉन-पेअर.

[९]पृथ्वीबाहेरच्या अवकाशातून (विश्वातून) पृथ्वीवर येतात ते 'विश्वकिरण'. इंग्रजीत कॉस्मिक रेज.

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

परीक्षा म्हणजे स्वतःच्या आत डोकावून पाहण्याची संधी.

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १६**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ४७ वा : पेरखड-बाँकानेर मु. हनुमान मंदिर (रामचन्द्रदास)**

चहाच्या आग्रहामुळे आजही निघायला नेहमीपेक्षा उशीर झाला (जो पुढे पथ्यावर पडला). भोगेश्वर आश्रमाकडे न जाता पुढे निघून जाण्याचा प्रयत्न अंगाशी आला. रस्ते, उपरस्ते, टेकड्या, नदी ओलांडणे या चक्रव्यूहात रस्ता चुकलो आणि नदी दुसऱ्याच ठिकाणाहून ओलांडून टेकडीवर चढलो आणि नर्मदे हरचा नारा दिला तर एक पीतांबरधारी व्यक्ती प्रकट झाली. तिला काही ठाऊक नव्हते. (कारण ती व्यक्ती होती पेरखेड राममंदिराचे पुजारी श्री. राजेश जोशी जे ८/१० दिवसांपूर्वीच पुजारी म्हणून या गावात रुजू झाले होते.) त्या टेकडीवरून आवाज देऊन त्यांनी पलीकडल्या टेकडीवरून जात असलेल्या दोघांना थांबविले. आम्ही थोडे सव्यासपव्य करून ती नदी पुन्हा ओलांडून मागे आलो व त्या तरुणांच्या सोबतीने योग्य मार्गाला लागलो. पुन्हा पाऊल पाऊल धूळ, टेकड्या, खोरी यांतून पुढील गाव गाठले. पहिल्याच घरात चहा विचारला आणि अत्यंत अगत्यशील स्वागतासह पूर्ण पेलाभर दुधाचा उत्तम चहा प्रत्येकाला मिळाला. तोपर्यंत आणखी तिघे परिक्रमावासी आले. त्यांतील एक जण तरुण, आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा होता. अगदी मणिनागेश्वर येथील साहेब बाबासारखा!

तो (सधन) शेतकरी होता. बरोबर दोन सेवक होते सामान घेण्यासाठी. कारण निघाला तेव्हा याचा पाय इतका दुखत होता की बाइकला किक् मारणे शक्य नव्हते. अर्थात् परिक्रमेत ते दुखणे दूर झाले होते. ४० ते ४५ कि. मी. दिवसाला या वेगाने ते चालत होते.

हे गाव येईपर्यंत शेती वाडी, लागवड काही नव्हती. फक्त माती, धूळ, खदानी व खदान रस्त्यांवरचे टॅक्टर / जे.सी.बी. इ.

वस्ती लागली की जिवात जीव येतो. कारण अशा विभागात गाव येईपर्यंत मनुष्यविरहित, रूक्ष आणि चिंता वाढविणारी, न संपणारी वाटचाल असते.

पुढील गावात पुन्हा एकदा आग्रहाने चहा मिळाला. फार आदरपूर्वक चौकशी झाली आणि निरोप घेताना कुटुंबातील आणि आजूबाजूच्यांनी, प्रत्येकाने वाकून शिस्तशीर नमस्कार केला.

ही श्रद्धा, भावना पाहून मी हेलावून गेलो. पहिल्या, दुसऱ्या गावातून जाताना एक सल्ला होता की लकडीका हाथ नहीं छोडना।

रस्त्याला फाटा फुटला तेव्हा उजवी धरून पुढे निघालो तेव्हापासून सोडलेल्या (सरळ) रस्त्यासमोरच्या दिशेला एक टेकडी फार दूर अंतरावर दिसत होती आणि आताही डाव्या बाजूला ती सतत दिसत होती. टेकडीवर गेरू रंगाचे बहुधा देऊळ दिसत होते आणि भोलेशंकराची भजने लाउडस्पीकरवर लावलेली ऐकू येत होती.

शरीफपुरा गावात येण्यापूर्वी दोन्ही बाजूला भरपूर शेतीलागवड दिसली. पहिल्या गावापासूनच ही शेती दुतर्फा लांबवर पसरलेली होती. कडुलिंब व चिंच आणि बाभूळ या वृक्षांची सावली सुखद वाटत होती. रस्ता कच्चा रस्ता होता.

शरीफपुरा गावाजवळ अद्रक (आले) व हळद यांची लागवड दिसली. शेतीत बैलजोडी लावून वाफे करण्याचे काम चालले होते. त्या रांगेत अनेक बगळे हारीने वाट

पाहत थांबलेले असत. जवळून बैलजोडी गेली की, उडणारे कीटक व निघणाऱ्या अळ्या चट्टामट्टा करत तिथेच थांबत. पुन्हा ती बैलजोडी परतून दुसऱ्या वाफ्याचे कार्य करीत परत येईपर्यंत (शेते इतकी विस्तृत की बैलजोडीला १० मिनिटे एका फेरीला लागतील.) हे सर्व बगळे नांगरटीमागे न धावता (जे एरव्ही घडताना मी पाहिले होते) जागीच उभे राहून प्रतीक्षा करत.

परिक्रमेच्या पुढील मार्गाबद्दल आम्हांला जवळच्या रस्त्याचे मार्गदर्शन स्थानिक लोकांकडून मिळत होते. त्यानुसार शरीफपुरा गावातून बडदा गावी जाण्याऐवजी सरळ बाँकानेर गावात जाणारा उजवा रस्ता निवडला आणि थोडे पुढे आलो तर ती सकाळपासून भजन ऐकविणारी टेकडी, समोरच आली. पहिल्या गावात उजवीकडे न वळता सरळच आलो असतो तर या टेकडीपाशीच निघालो असतो हा विचार मनात येऊन गेला.

सकाळपासून शुभेच्छांचे फोन सौ. मंगलला येत आहेत कारण आज तिचा वर्षवाढदिवस आहे.

टेकडीवर काही कार्यक्रम होता. आम्ही तिथून जात असताना एक मोटरसायकल थांबली व मागच्या सीटवर बसलेल्या काषायवस्त्रधारी बाबाने भोजनाचे निमंत्रण दिले. टेकडीवर अमावास्येनिमित्त कन्याभोजन भंडारा होता. ११.४० झाले होते. हो म्हटले आणि उन्हात टेकडी चढलो (टेकडी छोटी असून एकदा थांबावे लागले) व सरळ पानावर बसलो.

वरण, भात, भाजी, शिरा, जिलबी, पुरी, पापड असा नामांकित बेत होता. मैय्याने मंगलच्या वाढदिवसाचे मिष्टान्न स्वतःच्या घरात बोलावून दिले.

इथे टेकडीवर मंदिर नसून शरणचैतन्य बाबांची कुटी आहे. गावापासून थोडी दूर असलेली टेकडी आज पुनर्वसिन शरीफपुरा गावासमोर आहे.

परिक्रमा केलेले हे बाबा एका आश्रमातील व्यवस्थापक होते, परंतु इथे येऊन राहिले १० वर्षांपूर्वी !

यापूर्वी पाटीदार लोकांच्या या गावात कन्याभोजन/ अमावस भोजन वैयक्तिक स्वरूपात स्वतःच्या घरी होई, परंतु आता वर्षभराची नावे मुक्रर होऊन दर आवसेला, भोजन इथे होते व गावातील स्त्रिया स्वयंपाक करतात. आज आम्हांला मैय्याने इथे जेवू घातले. कधी नव्हे ते मी ५/६ जिलब्या खाल्ल्या. एरव्ही मी एकाच्यावर जिलबी खात नाही.

यानंतरचा प्रवास कष्टप्रद होता. कारण रस्ता २०' हून रुंद होता, कच्चा होता, सरळ होता; परंतु मन आणि सावली देणारे वृक्ष नव्हते.

उन्हामुळे त्रास व्हायला लागला. सावली शोधून थांबायचे. त्यातच एका गावात थांबलो असता चहा मिळावा, एक आत्मारामही परिक्रमावासी भेटला. ज्याने आम्हांला 'मांडवगड' न जाता पुढे जाण्याचा सरळ रस्ता सांगितला.

आज किंवा काल जाताना वाटेत पपईच्या बागा लागल्या. कच्च्या पपया गोणपाटे बांधून झाकल्या होत्या. वाफ्यांमध्ये पिकलेल्या पपया पडल्या होत्या.

मनात आले होते की मालक हजर असता तर बरे झाले असते; परंतु त्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत आम्ही त्या बघत बघत पुढे निघून गेलो होतो.

आज मात्र चहापानानंतर एका व्यक्तीने एक पिकलेली पपई आम्हांला आणून दिली. नर्मदे हर!

बाँकानेर गावाच्या अलीकडे २ कि.मी. वर एका गावात आगतस्वागतासह चहा मिळाला; राहायचा आग्रह झाला.

बाँकानेर प्रवेशापूर्वी नदी लागली. त्यात स्नान केले व गावातील हनुमान मंदिरात मुक्काम केला!



तुम्ही जेवढं इतरांना द्याल तेवढंच किंबहुना त्याच्या कित्येक पटीने देव तुम्हाला देईल.

समोरच जत्रा आहे. संक्रांतीपर्यंत. त्यात फिरलो, बरेच फोटो घेतले.

मंदिरात भोजन केले. (संध्याकाळी जत्रेत इमारती (जिलबी) तयार करणाऱ्या कलाकाराचे चलच्चित्रण केले. नमुन्या दाखल दिलेल्या जिलब्या (गुळाचा पाक) खाल्ल्या, दिलेल्या ३ इमरती मंदिरात भोजन करीत असलेल्या एक मूर्ती + २ माताराम यांना दिल्या.)

**दिवस ४८ वा बाँकानेर-धर्मपुरी मु. राममंदिर (नर्मदातटी)**

६ वाजता आश्रमबाबाने म्हटल्याप्रमाणे चहा आणून दिला, निघताना पुन्हा एकदा दिला.

आता मैय्यापासून ३/४ कि.मी. वरून जाणारा राजरस्ता आहे. त्याने प्रवास सुरू आहे. गेले दोन दिवस थंडी कमी झाली आहे. पण राजरस्त्यावर उन्हाचा फार त्रास होतो.

थंडी कमी, परंतु रात्री मला गेले २/४ दिवस ३/४ वेळेला लघुशंकेसाठी उठावे लागत आहे आणि लागली असली तरी लघवी कोंडल्यासारखी होतेय. प्रोस्टेट ग्रंथी वाढल्याचा हा परिणाम आहे. घरी किमान ३ वेळा उठावे लागे. परिक्रमेत सुरुवातीला एकदाच उठावे लागे; परंतु थंडीमुळे की काय, चार-चार वेळा उठावे लागते.

बाँकानेर सोडल्यापासून सतत मांडवला जाण्याच्या सूचना सुरू आहेत. माझ्या सॅकमधील पाण्याच्या बाटल्यांतील पाणीही डुचमळत तेच सांगायचा प्रयत्न करतेय. एकाने मागे बोलावून चहा दिला व सांगितले की परिकम्मा असेल तर मांडवमार्गेच जावे लागेल व जावे! (झिरई गाव)

वाटेत गाडी थांबवून, हाच सल्ला मिळत होता. धरमपुरी गावाच्या अलीकडे एकठहरा गावात हेच, त्याआधी बाँकानेर मार्केटनंतर एका साधूने बाइक थांबवून हेच सांगितले. या सद्सक्ष्यांच्या धास्तीने आम्ही धाब्यावर जेवलो व संध्याकाळी ५॥ वाजता धर्मपुरी गाठले व राममंदिरात मुक्काम केला. (इथूनसुद्धा मांडवगडावर जाता येते.)

येथील श्रीरामधामाश्रमातील महन्त श्री मिथल बिहारीदास महाराज म्हणजे अगत्यशील तरुण साधू आहे.

श्रीराममंदिर सोबत हनुमान व शिवलिंग अशा तीन देवखोल्यांचे हे मंदिर फार सुंदर आहे. उद्घाटन होऊन महिनाही झालेला नाही.







बाबांची कुटी बाजूला आहे. हवे ते करून देतो म्हणावे. आम्हीही बटाटे, टमाटे, मिरच्या कापल्या, कोथिंबीर चिरली, मटार सोलून दिले. (पालकही निवडला.) हे सारे एकत्र करून झकास तुपाची फोडणी दिलेली स्वादिष्ट खिचडी बाबांनी गॅसवर तयार केली व आम्ही चौघे (बाबांसह) जेवलो.

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

# ''अणुरेणुया थोकडा तुका आकाशाएवढा''

*दि. ७ मार्च २०१५, फाल्गुन कृष्ण द्वितीया या दिवशी 'तुकाराम बीज' महाराष्ट्रभर साजरी झाली. संतशिरोमणी तुकाराम महाराजांच्या जीवनदृष्टीने मराठी सारत्वतांवर दीर्घकाळपर्यंत मोहिनी घातली आहे. तुकारामांच्या संदेशाची समयोचितता सिद्ध करणारा हा लेख - संपादक*

ज्ञानेश्वर व तुकाराम हे मराठीजनांचे श्वासोच्छ्वास आहेत. महाराष्ट्रातील सारस्वतांना ज्या वाणीने अक्षरशः मंत्रमुग्ध केलं आणि प्रासादिक व माधुर्यपूर्ण शब्दकळेनं दिपवलं त्या कैवल्यसाम्राज्यचक्रवर्ती ज्ञानेश्वरांनी एका वैचारिक युगाचा आरंभ केला.

''ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया ।
तुका झालासे कळस भजन करा सावकाश ॥''

असे वचन वैष्णव संप्रदायात सर्वश्रुत आहे. या मराठीचिया नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ घेऊन येणारे ज्ञानेश्वर महाराज हे वारकरी संतपरंपरेत मूर्धन्यस्थानी होते. मु. भगवद्गीतेवर आदिशंकराचार्यांच्या भाष्याची 'वाट पुसत' त्यांनी भक्तितत्त्वाची मुहूर्तमेढ रोवली. याच परंपरेत पुढे सोळाव्या शतकात संत तुकारामांचा उदय झाला. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास.

''आम्ही वैकुंठवासी, आलो याची कारणासी ।
बोलीले जे ऋषी, साच भावे वर्ताया ॥''

अनादिकाळापासून असलेल्या तत्त्वाचं अनुसंधान करावे व ऋषिमुनींनी घालून दिलेल्या मार्गावर लोकांनी चालावे हा तुकोबांच्या जीवनाचा उद्देश आहे (उजळावया आलो वाटा)

''उजळावया आलो वाटा, खरा खोटा निवाडा''

भक्तितत्त्वाच्या वाटा 'उजळावया' आम्ही आलो असं तुकोबा म्हणतात. मात्र तुकोबांकडे केवळ तत्त्वज्ञ, संत आणि अगदी जुन्या पद्धतीनेच पारायणांच्या, कीर्तन प्रवचनांच्या माध्यमातूनच पाहिले जाते. आजच्या एकविसाव्या शतकात तुकोबा समयोचित (Relevant) आहेत काय? तुकोबांकडे एक आपल्यासारखाच सामान्य माणूस म्हणून पाहता येईल का? तुकोबांच्या क्रांतिकारक विचारांचा आजच्या पिढीला उपयोग कसा होईल? व केवळ म्हातारपणी निवृत्त झाल्यावर, काही काम नाही म्हणून तुकोबा व ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांचे परिशीलन करायचे काय? अशा अगणित प्रश्नांना उत्तरे शोधण्याचा हा अल्पसा प्रयत्न. अर्थात त्यासाठी निमित्तही आहे तुकाराम बीजेचे. ७ मार्च रोजी म्हणजे फाल्गुन शुद्ध २ या दिवशी तुकारामचरित्रानुसार तुकाराम सदेह वैकुंठास गेले. तो दिवस 'तुकाराम बीज' म्हणून अखिल वारकरी संप्रदायात साजरा केला जातो.

तुकाराम महाराज या व्यक्तीचं गारुड केवळ मराठी मनावरच नाही. अनेक ख्रिस्ती तत्त्वचिंतकांनीदेखील तुकोबांच्या अभंगांचा इंग्रजी अनुवाद करवला. फादर डाबरे, फादर फेलिक्स मेचॅडो व फादर फ्रान्सिस दिब्रिटो या ख्रिश्चन तत्त्वचिंतकांवर तुकाराम महाराजांचा विलक्षण प्रभाव आहे.

अगदी आपल्या आवडत्या मराठी कवींवर, लेखकांवर व समीक्षकांवर हा प्रभाव सहजपणाने दिसते. विंदा करंदीकरांची एक प्रसिद्ध कविता शेक्सपियर व तुकोबांची भेट घडवून आणते.

तुकोबाच्या भेटी शेक्सपियर आला
सोहळा तो झाला दुकानात ।
दोघांचीही झाली उराउरी भेट
उराचेच थेट उरामाजी ॥

स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याचा वापर कधी करु नका आणि स्वतःचा वापर कुणाला करु देऊ नका.

शेक्सपियर व तुकाराम दोघेही समकालीन कवी. सोळाव्या शतकात किंग लिअर, हॅम्लेट, ऑथेल्लो या शोकान्त नाटकांनी इंग्रजी नाट्यभूमी शेक्सपियर गाजवत होता तर इकडे महाराष्ट्रात तुकोबा 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' म्हणत निसर्गाशीच अनुसंधान साधत होते. अगदी भालचंद्र नेमाडेंपासून ते तुकारामांना प्रथम इंग्रजीत "Says Tuka" या पुस्तकाने विश्वसाहित्यात अजरामर करणारे दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्यापर्यंत तुकारामांची मोहिनी कायम आहे.

संतसाहित्याचे अभ्यासक व ज्येष्ठ ख्रिस्ती चिंतक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या मते तुकाराम हा बायबलच्या जुन्या करारातील (Old Testament) मधील 'जॉब' या प्रेषिताच्या व्यक्तिरेखेशी मिळताजुळता आहे. जुन्या करारातील 'बुक ऑफ जॉब' मध्ये सविस्तर वृत्तान्त आढळतो की जॉबसुद्धा एका सधन कुटुंबातील एक उमदा तरुणपण पुढे -

''कत्वं कोऽहं कुत आयातः'' मी कोण? कुठून आलो? जीवनाचं सार्थक कशात आहे, असे प्रश्न त्यालाही पडू लागले. नंतर सर्व संपत्ती, कुटुंब, मान, सन्मान या सर्व गोष्टींची वाताहत झाली. अनेक वेदना व दुःखांतून तावून सुलाखून निघून त्याने परमेश्वराचा मार्ग चोखाळला.

मी जेव्हा तुकोबांची गाथा वाचतो तेव्हा असे लक्षात येते की तुकाराम हे तुमच्याआमच्यासारखे ''आम आदमी'' होते. त्यांना समाजात वागताना आलेल्या अनुभवांनी समृद्ध केलं. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंगानंतर त्यांच्या मनातील भावभावनांचे तरंग त्यांनी आपल्या गाथेत लिहिले. 'तुकाराम गाथा' ही मला तुकोबांची रोजनिशी (Diary) वाटते. ज्याप्रमाणे महात्मा गांधी भगवद्गीतेबद्दल म्हणत की, "Geeta is my dictionary. Whenever I find difficulty, I refer to it."

खरेतर तुकारामांचे अभंग व त्यांचे एकूणच वाङ्मय वरील वाक्याची साक्ष देते. जीवनाच्या धकाधकीच्या मामल्यात स्वतःसाठी वेळ काढताना आपल्या नाकी नऊ येतात. मग तुकोबांसारखं दुःख सोसल्यास आपण नक्की जिवंत तरी राहू का?

एका अत्यंत साधन सावकाराच्या घरी जन्मलेला हा उमदा तरुण 'तुकोबा बोल्होबा अंबिले' नावाने प्रसिद्ध होता. १६२३ च्या आसपास महाराष्ट्रात अत्यंत भीषण दुष्काळ पडला आणि तुकारामांची व त्यांच्या कुटुंबाची वाताहत झाली. समर्थ रामदासांच्या वाङ्मयातदेखील या भीषण दुष्काळाचे चित्रण आढळते. तुकोबांनी आपला संसार गमावला. एक पत्नी अन्नान्न दशा होऊन दगावली. घरची सावकारी बुडाली. सावकारीच्या हिशोबाच्या वह्या त्यांनी गंगार्पण केल्या. अत्यंत सकारात्मक दृष्टिकोनातून आयुष्याकडे अशा कठीण प्रसंगीसुद्धा तुकोबा पाहत. एका अभंगात तुकोबा म्हणतात -

''बरे झाले देवा निघाले दिवाळे । बरीया दुष्काळे पीडा गेली ॥
अनुतापे तुझे राहिले चिंतन । झाला हा वमन संवसार ॥
बरे झाले जगी पावलो अपमान । बरे गेले धन गुरे ढोरे ॥
बरे झाले नाही धरिली लोकलाज । बरा आलो तुज शरण देवा ॥

तुकोबा असं म्हणतात की माझा जगात अपमान झाला, मला लोक वेडा समजत, धनसंपत्ती गेली. यामुळे मला अनुताप म्हणजे वैराग्य निर्माण झालं.

अगदी सुरुवातीला अभ्यासात चित्त लागत नव्हतं. देव प्रसन्न होईल काय अशी धाकधूक मनाला वाटत असे असं अगदी मोकळेपणानं तुकोबा नोंदवतात.

''दुष्काळे आटिले द्रव्य नेला मान । स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ॥
आरंभी कीर्तन करी एकादशी । नव्हते अभ्यासी चित्त आधी ॥

खूप लोक वेगवेगळ्या गोष्टी सांगायला आले, पण मी त्यांचं न ऐकता सत्य व असत्याशी माझ्या मनाला साक्षी ठेवून निर्णय घेत गेलो. लोक काय म्हणतील याचा

विचार मी केला नाही असं तुकोबा निक्षून सांगतात.

वचने मानिली नाही सुहृदांची । समूळ प्रपंची वीट आला ।
सत्य असत्यासी मज केले ग्वाही । मानियले नाही बहुमता ॥१॥

तुकारामगाथेत 'धरणेकऱ्यास उपदेश' असे प्रकरण येते. त्यात तुकोबांनी एका साधकाला उपदेश केला आहे. जो आजही आपल्या आयुष्यात तंतोतंत लागू पडतो.

''बहुतां छंदाचे बहु असे जन । नये वाटू मन त्यांच्या संगे ।
करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ॥

तुकोबांच्या जीवनात अनेक प्रसंग असे आले जे आपल्या जीवनात नेहमी येतात. लेकरू ऊस खायचा म्हणून रडायला लागल्यावर तुकोबा उसाची मोळी बांधून घरी निघतात. वाटेतली अनेक मुलं तुकोबांना ऊस मागतात व तुकोबा आपल्या घरच्या रडणाऱ्या मुलाचा विचार न करता घरी रिकाम्या हाताने येतात. पत्नीने विचारल्यावर त्यांचं उत्तर असतं,'अगं, वाटेतली मुलं काय दुसऱ्याची होती? ती पण आपलीच की!' माझा व तुझा भाव तुकोबांनी विसरला होता.

एकदा शेतात कणसांचं पक्ष्यांपासून संरक्षण करण्यासाठी तुकोबांना राखणदार बसवलं जातं. मात्र ते सर्व सृष्टीत परमेश्वर पाहतात व पक्ष्यांमध्ये त्यांना पांडुरंग दिसतो.

त्यांच्या तोंडून हे उद्‌गार येतात -

''अवधी भूते साम्या आली । देखिली म्यां कै होती ।
विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ॥
माझी कोणी न धरू शंका । ऐसे हो कां निर्द्वंद्व ।
तुका म्हणे जे जे भेटे । ते ते वाटे मी ऐसे ॥

सगळी भूतं ज्यांना साम्यत्वास आली त्या तुकोबांना छत्रपती शिवाजी महाराजांनी रत्नांचा नजराणा पाठवला होता. अर्थात राज्यसत्तेसमोर एक कफल्लक व फाटका माणूस म्हणून तुकोबांनी वाकायला हवं होतं पण त्यांचा शेलका अहेर ऐकून शिवाजी महाराजांचाही तुकोबांबद्दल आदर द्विगुणीत झाला. तुकोबांचे शिवाजीराजांना उत्तर फार सुंदर आहे -

''मुंगी आणि राव । आम्हा सारखाची जीव ।
गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फासा ।
सोने आणि माती । आम्हा समान हे चित्ती ॥१॥''

ज्याप्रमाणे तुकोबा एक तत्त्वचिंतक आणि भक्तिक्षेत्रातील संत होते तसेच समाजातील दंभ, रूढी, परंपरा यांच्यावर त्यांनी आसूड ओढले आहेत. सोळाव्या शतकातील भक्तिक्षेत्रात माजलेल्या बजबजपुरीवर अत्यंत परखड विचार मांडून अंधश्रद्धानिर्मूलनाचे कामही तुकोबा करतात. जर नवसासायासाने मूल होत असेल तर पती कशाला करायचा?

'नवसे कन्यापुत्र होती । तरी का करणे लागे पती ।'

हा त्यांचा रोकडा सवाल आहे. त्या काळात असलेल्या बुवाबाजीबद्दल तुकोबा म्हणतात की केवळ अंगाला राख फासून कोणी साधू होत नाही.

'ऐसे कैसे झाले भोंदु । कर्म करुनी म्हणती साधु ।
अंगा लावूनीया राख । डोळे झाकूनी करीती पाप ॥

त्या काळातील शक्तिपंथीयांचाही तुकोबांनी निषेध केला आहे. यज्ञयागाढी अवंडबर माजवण्यापेक्षा परमेश्वराला 'भावाच्या बळे' आळवावं. 'उच्च नीच काही नेणे भगवंत' देवाला उच्चनीच असं काही माहीत नाही. तो केवळ भक्तीचा भुकेला आहे असं तुकोबा मानतात.

वारकरी संतांबद्दल जो आक्षेप घेतला जातो की, त्यांनी निवृत्तिपर मार्ग दाखवला. आहे त्या परिस्थितीत दैवावर विश्वास ठेवून राहावे असा सल्ला या मंडळींनी दिला असाही आक्षेप आहे. परंतु तुकोबांचे आयुष्य हा 'कर्मयोगाचा' मूर्तिमंत आविष्कार आहे. त्यांनी आधी

सावकारी केली. नंतर दुष्काळात संपत्ती, कुटुंब यांची वाताहत झाल्यावरदेखील संसार नेटाने केला. ते पडेल ते काम करत असत. संसार करताना पैसा उत्तम प्रकारे व योग्य मार्गाने कसा कमवावा याचाही आदर्श तुकोबा घालून देतात.

'जोडोनिया धन उत्तम व्येवहारे। उदास विचारे वेच करी ॥

याचा अर्थ पैसा हा योग्य मार्गाने मिळवून अत्यंत सावधपणे संसार करावा असा सल्ला देतात. मात्र तुकोबांच्या समोर जीवनाचं ध्येय हे 'परमेश्वर प्राप्ती' असल्यामुळे संसारात ते फार काळ रमले नाहीत. त्यांच्या पत्नीवर - 'आवली' वर - त्यांचे नितांत प्रेम आहे. त्यांच्या सांसारिक दारिद्र्याच्या अनेक कथा सांगितल्या जातात. पण तुकोबांची भक्ती त्यांच्या पत्नीमुळेच फळली. ते 'भंडारा' डोंगरावर परमेश्वराची साधना करत बसत तेव्हा देहूतून तुकोबांना भाकरी घेऊन 'आवली' येत असे. शेवटी तुकोबा आपल्या पत्नीलाही उपदेश करतात की, ''या संसारात फार गुंतू नको. आपल्या जन्माचं सार्थक परमेश्वराच्या भक्तीत आहे.''

साने गुरुजींनी 'भारतीय संस्कृती' या अजोड ग्रंथात 'मृत्यूचे संगीत' या शीर्षकाचा एक अप्रतिम लेख लिहिला आहे. मृत्यूकडे सर्व तत्त्वज्ञ कशा दृष्टीने पाहतात याचा ऊहापोह यात केला आहे. तुकोबा मृत्यूकडे फारच सकारात्मकपणे पहातात. निर्वाणीच्या अभंगात तुकोबांचा एक नितांतसुंदर चरण आहे.

'झाला प्रेतरूप शरीराचा भाव। लक्षियेला ठाव स्मशानीचा ॥
वैराग्याच्या शेणी लागल्या शरीरा। ज्ञानाग्नी लागला ब्रह्मत्वेसी ॥
दिली तिळांजुळी कुळनामरूपासी। शरीर ज्याचे त्यासी समर्पिले ॥
तुका म्हणे रसा झाली आपोआप। उजळला दीप गुरुकृपा ॥

तुकोबा म्हणतात की, हे शरीरच आता प्रेतरूपानं आहे. पंचमहाभूतांना समर्पित केलं आहे. 'महावाक्य' रूपी ध्वनीची बोंब करून मी शरीराला वैराग्याच्या 'शेणी' (गोवऱ्या) लावल्या आहेत.

तुकोबा आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता व्यक्त करताना म्हणतात कि,

''याचेसाठी केला होता अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा ॥
आता निश्चितीने पावलो विसावा। खुंटलेया धावा तृष्णेचिया।
कवतुक वाटे झालिया वेच्याचे। नाव मंगलाचे तेणे गुणं।
तुका म्हणे भक्ती परिनेली तो वरी। आता दिवस चारी खेळीमेळी ॥''

मी याच्यासाठीच हा सगळा अट्टाहास केला. आता पांडुरंगाची कृपा झाली आहे. माझा शेवटचा दिवस गोड झाला. मी आता निवांत झालो. कारण माझी इच्छा, तृष्णा (Desire) नष्ट झाली. जे जीवन मी जगलो त्याचं मोठं कौतुक वाटतंय मला. माझं भक्तीशी अनुसंधान असल्यामुळे आता जे उरलेले दिवस आहेत ते खेळीमेळीमध्ये घालवावे अशी इच्छा तुकोबा व्यक्त करतात. तुकोबा बीजेच्या दिवशी सदेह वैकुंठाला गेले असा उल्लेख आहे. मात्र हे जगणं व ज्या जगात ते जगले या सर्वांनाच त्यांनी वैकुंठमय केलं होतं हे निश्चित. तुकोबांनी 'गाथा' चारशे वर्षांपूर्वी लिहिली नसून त्यांनी 'गाथा' लिहिली हे कळायला आम्हांला चारशे वर्षे लागली. ती समजून घ्यायला अजून किती वर्षे लागतील?

**प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# मेंदू : एक दिशादर्शक

*मेंदू! विलक्षण दिशादर्शक त्याबद्दल विश्लेषण लेखकाने केले आहे - संपादक*

एक विविध कला प्रदर्शन पाहायला गेलो होतो. बऱ्यापैकी दर्जा होता. चित्रकला, शिल्पकल, धातुकाम, मातकाम, विणकाम, कचऱ्यापासून टिकाऊ वस्तू, रांगोळया अशा विविध कृती कलाकारांनी मांडल्या होत्या. पाहून खूप बरं वाटलं. मनात आलेले काही विचार व्यक्त झाले ते असे -

कोणतीही कृती तुम्ही करता तेव्हा स्वतःच्या बुद्धीचा गौरव करत असता. बुद्धी म्हणजे आकलनशक्ती. ती आपल्या मेंदू या इंद्रियातील केंद्रात समाविष्ट असते आणि त्या बुद्धिदेणगीचा माणूस कमी वा पूर्ण उपयोग करत असतो. तिचा वापर करून मिळणारे एक ईश्वरीय समाधान असते. लोकांना ही कृती आवडली तर ते तुमचा वैयक्तिक किंवा जाहीर गौरव करतात. सोने, नाणे स्वरूपात हा गौरव असेल तर तुम्हांसही त्यातून ऐहिक सुख लाभते. तुमची बुद्धी तुमचे आयुष्य नियंत्रित करत असते. एक उदाहरण घेऊ या. माणसाच्या नेहमीच्या चालणे, बोलणे, पाहणे, खाणेपिणे इ. अपरिहार्य - मेंदूनियंत्रित कृती सोडल्यास एका क्षणी बुद्धी तुम्हांला सुचविते (म्हणजे आपल्या मनात आले असे आपण म्हणतो) ''तू गाणं शीक''. तुम्ही गुरू गाठून गाणं शिकण्यास सुरुवात करता. दिवस जातात. त्यानंतर आपल्याला आपला आवाज ऐकून व शिक्षकाची वा! दाद मिळाल्यावर बरं वाटतं. 'अरे आपल्याला थोडंसं येतंय हे.' ही कृती सातत्यभावाने दिवसेंदिवस वर्षानुवर्षे केली तर त्या शास्त्रातील परिपूर्णतेचे शिखर आपणांस दिसू लागते. आता ते गाठण्याची ओढ लागते. एके काळी आपणांस स्वर-ताल कळत नव्हता. आज आपणांस स्वरतत्त्व, लयतत्त्व समजू लागलंय, कलेचा गाभा सापडलाय मग ते शिखर का नाही मी गाठणार? ह्या कमावलेल्या आत्मविश्वासातून मग आपला देह आणि मन (आत्मा) त्या कृतीमागे धावू लागतं. साध्या भाषेत चिकित्सेची, विश्लेषणाची नजर येते आणि अध्यात्मभाषेत आपण सूक्ष्माचा ध्यास घेतो. त्यांचे ते मोक्ष म्हणजे सर्वोच्च स्थान याहून वेगळे काही नसते. विद्वत्जनसभेत मग पंडित, विद्वान उपाधी लाभतात.

चौसष्ट कलांपैकी एक किंवा अधिक कला, शास्त्र निवडून एखादा कलाकार काल-स्थल भान विसरून संपूर्ण समर्पित कालक्रमणा करतो. मी रोज तीन तास रियाज करतो, पाच तास दगड कोरतो असा मानवी हिशोब त्याच्या गावी नसतो. त्यांचे कला हेच जीवन. त्यासाठीच जगणे असते त्यांचे.

त्यांच्या सुंदर कला आविष्कार /दर्शनातून जनसामान्य धन्य होतात. त्या कलेतील भव्यदिव्य दर्शन/ श्रवण आपणांस जमत नाही, पण हा कलाकार ते घडवतोय ही पंचेद्रिये धन्य झाल्याची भावना असते जनसामान्यांची.

ह्या धन्यता भवनेतून त्या कलाकाराबद्दल कृतज्ञता म्हणून समाज शक्य असेल ते करत असतो. असे कलाकार, शास्त्रज्ञ आणि त्यांना शिरोधार्य मानणारा समाज यांचा संयोग झाला तर अर्थातच त्या समाजाची सांस्कृतिक पातळी उंचावते आणि हे घडण्यासाठी त्या कलाकाराचे बुद्धितेज समाजउन्नतीसाठी दिशादर्शक ठरते.

(पृष्ठ क्र. २७ वर)

# हैद्राबाद व्हाया श्रीशैलम ते मंत्रालय

*आंध्रप्रदेशातील श्रीशैलम हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक. या देवस्थानाच्या सहलीचे वर्णन करणारा लेख - संपादक*

भारतात शिवाची एकूण बारा स्थाने आहेत. अशा बारा ठिकाणच्या स्थानांना बारा ज्योतिर्लिंगे असे म्हटले जाते. भरतखंडात विखुरलेल्या विविध स्थानांची आता फार मोठी धार्मिक स्थळे झालेली आहेत. असंख्य शिवभक्त त्या स्थानांचे दर्शन घेण्यासाठी येतात. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनमधील भ्रमणमंडळाचे आम्ही सर्व सभासद मागील पाच वर्षांपासून 'बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन' असा एक विषय घेऊन कुठल्या ना कुठल्या ज्योतिर्लिंग दर्शनासाठी जात असतो. भ्रमणमंडळाचे प्रमुख माजी प्राचार्य श्री. मुजुमदार सरांचे मार्गदर्शन याबाबत फार मोलाचे असते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आमचा आठ-दहा जणांचा ग्रुप आहे.

२०१३ सालच्या डिसेंबरमध्ये आम्ही गुजरात राज्यातील सोरटी सोमनाथ, द्वारका आणि पोरबंदर अशा ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. डिसेंबर महिना हा आमच्या सहलीचा काळ असतो. २०१४ च्या डिसेंबरमध्ये आम्ही मंडळींनी आंध्रप्रदेशातील श्रीशैलम येथे जाण्याचे ठरवले आणि त्या दृष्टीने सहलीचे नियोजन केले. दि. २४ डिसेंबर २०१४ रोजी सी.एस.टी.वरून सुटणाऱ्या हुसेनसागर एक्सप्रेसने कल्याण जंक्शन येथून रात्री १०.४५ वाजता आमच्या सहलीचा प्रारंभ झाला. नेहमीप्रमाणे आणि सूचित केल्याप्रमाणे आमचे सगळे सहकारी वेळेत स्टेशनवर पोहोचले. मध्य रेल्वे मार्गावरील कल्याण जंक्शन नेहमीच गजबजलेले असते. थंडीचा महिना असल्याने प्रत्येकाने उबदार कपडे सोबत आणले होते. इतक्यात हुरेनसागर एक्सप्रेस येण्याची अनाउन्समेंट झाली आणि गाडी पकडण्यासाठी आम्ही तयार झालो. बरोबर १०.४५ वाजता हुसेनसागर एक्सप्रेस कल्याण स्टेशनवर आली. तिकिटे विभागून असल्याकारणाने दोन ग्रुप झाले. आमचा प्रवास हा कल्याण, पुणे, सोलापूर, वाडीमार्गे हैद्राबादपर्यंत होता.

दि. २५.१२.२०१४ रोजी दुपारी १२.१५ वाजता हैद्राबाद स्टेशनवर उतरलो. दुपारची वेळ असल्याने हैद्राबाद स्टेशनवर गर्दी कमी दिसली. आम्ही स्टेशनमधून बाहेर पडलो, आणि अगोदरच बुक केलेल्या टेम्पो ट्रॅव्हलर्सकडे गेलो. तो स्टेशनबाहेर आमची वाटच पाहत होता. आठ-दहा जण बसतील अशी ती गाडी होती. इतिहासकालीन निजामाची राजधानी हैद्राबादविषयीच्या आठवणी मनात यायला लागल्या. सामान गाडीत टाकून आम्ही हैद्राबाद स्टेशनवरून पुढील प्रवासास निघालो. राजधानी हैद्राबाद स्टेशनवरून मोठ्या जलाशयाच्या प्रमुख हायवेवरून जात असताना जलाशयामध्ये एक मोठा पुतळा दिसला. मी ड्रायव्हरकडे त्या पुतळ्याविषयीची चौकशी केली तर तो म्हणाला की हा पुतळा हुसेनचा आहे. ज्या ट्रेनने आम्ही मुंबईहून हैद्राबादला आलो त्या ट्रेनचे नावही हुसेनसागर एक्सप्रेस. यावरूनच या जलाशयाचे महत्त्व कळले. ह्या भल्या मोठ्या जलाशयाला हुसेनसागर असे नाव दिलेले आहे. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या त्या तलावाकडे मी तो दृष्टिआड होईपर्यंत पुन्हा-पुन्हा पाहत होतो. स्वच्छ आणि सुंदर बगीचा तलावाभोवती होता. हैद्राबाद शहरातून आम्ही २२० किलोमीटर अंतरावर असलेला श्रीशैलमकडे निघालो. शहरातून पुढे गेल्यावर वाटेत एका ढाब्यावर जेवण केले. श्रीशैलमला आम्ही रात्री साडेआठ वाजता पोहोचलो. सभोवताली जंगलाचा भाग होता. रात्रभर ट्रेनने

आणि दुसऱ्या दिवशी टेम्पोने प्रवास केल्यामुळे आम्ही मंडळी बुक केलेल्या भक्त निवासस्थानी पोहोचल्यावर हात-पाय स्वच्छ धुऊन झोपी गेलो.

दि. २६.१२.२०१४ रोजी सकाळी लवकर उठलो. थोडी पाण्याची कमतरता भासली. पण कसेतरी जमवून घेतले. तयार होऊन आम्ही मल्लिकार्जुन दर्शनासाठी गेलो. ठीक ७.३० वाजता रांगेने मल्लिकार्जुनबाबाच्या दर्शनाचा लाभ घडला. मल्लिकार्जुन नावाने स्थापित शिवलिंगदर्शनाने कृतार्थ वाटले. असे म्हटले जाते की बारा ज्योतिर्लिंग दर्शन नशीबवान व्यक्तींनाच घडते. आम्हां मंडळींची मनःकामना पूर्ण झाल्याचे समाधान झाले.

येताना रात्र असल्यामुळे श्रीशैलमचा परिसर समजत नव्हता. सकाळी मात्र आम्ही मंडळी श्रीशैलमवरून पुढे महानंदीकडे जात असताना त्या परिसराची भौगोलिक स्थिती समजून येत होती. पहाडी आणि जंगलाचा प्रदेश दिसत होता. श्रीशैलम हे ठिकाण पहाडीवर आहे. कृष्णा नदीवर श्रीशैलम या ठिकाणी मोठे धरण बांधले आहे. श्रीशैलमवरून आम्ही मंडळी कर्नूल जिल्ह्यातील महानंदीच्या दिशेने निघालो. दुपारी ३.०० वाजता महानंदी येथे पोहोचलो. तेथील दर्शन आटोपून पुढे मंत्रालयाकडे निघालो. जवळजवळ २३० किलोमीटर मंत्रालयाचे अंतर होते. नंदभाल-कर्नूल मार्गे रात्री ८.०० वाजता मंत्रालय येथे पोहोचलो. सुट्ट्यांचा कालावधी असल्याकारणाने भक्तनिवासात सोय झाली नाही. बाहेरच्या लॉजवर राहिलो.

दि. २७.१२.२०१४ रोजी आम्ही मंडळी सकाळी लवकर उठलो. तयार होऊन श्रीराघवेंद्रस्वामींच्या दर्शनासाठी गेलो. दर्शन झाले. मंदिर परिसर स्वच्छ होता. भाविकांची गर्दी खूप होती. मंत्रालय हे कर्नूल जिल्ह्यातील एक प्रसिद्ध ठिकाण आहे. तुंगभद्रा नदी शेजारून वाहते. कर्नाटकच्या सीमेलगत असल्याकारणाने दोन्ही राज्यांतली भक्तमंडळी मोठ्या संख्येने राघवेंद्रस्वामींच्या दर्शनासाठी येत असतात.

सकाळी आठ वाजता आम्ही मंडळींनी मंत्रालयाचा निरोप घेतला आणि कर्नूलमार्गे हैद्राबादकडे निघालो. कर्नूलहून हैद्राबाद २२० किलोमीटर आहे. वेळ सकाळची होती. गाडीत आम्ही भजने आणि भक्तिगीते म्हणत हैद्राबाद जवळ करीत होतो.

दुसऱ्या दिवशी (डिसेंबर २८ ला) माझी मुंबई केंद्रावर UGC NET-2014 परीक्षा होती. त्यामुळे २७ तारखेलाच माझे एकट्याचे परतीचे तिकीट काढले होते. दुपारी २.४५ वाजताची हुसेनसागर मला पकडायची होती. त्या दृष्टीने दुपारच्या २.४५ वाजताच्या हुसेनसागरसाठी मला हैद्राबाद स्टेशनवर पोहोचवले आणि मी २८ तारखेला मुंबईत पहाटे ४.५५ वाजता पोहोचलो. माझ्या सहकाऱ्यांचे तिकीट हे दुसऱ्या दिवशीचे असल्याने ती सर्व मंडळी त्या दिवशी हैद्राबादमध्येच राहिली. दि. २८ डिसेंबर २०१४ च्या हुसेनसागरने २९.१२.२०१४ रोजी ती मुंबईत दाखल झाली.

धार्मिक स्थळांना भेटी देणे हा आमच्या सहलीचा मुख्य उद्देश जरी असला तरी आम्ही त्या-त्या धार्मिक स्थळांभोवतीची ऐतिहासिक स्थळे, शहरे, भू-प्रदेश, प्रसिद्ध नद्या, तेथील बोलीभाषा इत्यादींचा जवळून अनुभव घेत असतो.

आम्हां मंडळींना ही सहल फार खडतर वाटली, कारण आम्ही जो प्रवास करीत होतो तो खूप लांब-लांबचा होता. त्यामुळे दिवसभर प्रवासाने कंटाळून जायचो. पण ठरविलेला विषय 'बारा ज्योतिर्लिंगे' पैकी श्रीशैलम दर्शन उत्तम प्रकारे विनाअडथळा पार पडले. आता प्रतीक्षा उत्तरेकडील ज्योतिर्लिंगांची!

**चंद्रकांत शिंगाडे**
ग्रंथालय साहाय्यक,
वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन,
ठाणे - ४००६०१

●●●

चेहरा हा आपल्या व्यक्तीमत्त्वाचा आरसा असतो.

# 'परनिंदेचे व्यसन'

*सतत निंदा करणे, हीन लेखणे व अफवा पसरवणे याची प्रमुख कारणे दर्शविणारा लेख - संपादक*

चित्रकाराने चित्र पूर्ण केले. एका सुंदर ललनेचे चित्र होते ते. एका भव्य दालनाच्या मधोमध ते चित्र प्रदर्शनासाठी मांडले. बघ्यांची गर्दी जमली. चित्रात सुधारणा करण्याविषयी प्रत्येक जण आपले मत मांडू लागला. चित्रकाराने आपले रंगसामान प्रेक्षकांसमोर ठेवले आणि म्हणाला, 'तुम्हांला माझ्या या निर्मितीत सुधारणा करावयाची असेल तर ताबडतोब समोर या आणि करा!' प्रेक्षकांपैकी कुणालाही चित्रकला येत नव्हती... गर्दी लगेच पांगली. मित्रांनो, दुसऱ्यांचे दोष दाखविण्यात आपण जेवढे तत्पर असतो, तेवढीच निष्क्रियता सुधारणा करण्यात असते. दिवसभरात आपण केलेल्या संभाषणाचे जर व्यवस्थित निरीक्षण केलेत तर तुमच्या लक्षात येईल की आपण बहुतांश वेळ 'निरर्थक गप्पा' (Gossiping/ Rumoring) मारत असतो. कोकणकन्येच्या जनरल डब्यातून मी प्रवास करत असताना काही प्रवासी टाइमपाससाठी 'मोदी-गुजरात' या विषयावर संशोधनस्वरूप चर्चा करीत होते. निद्राभंग झालेले काही प्रवासी उठून बसले आणि विषय 'पवार-बारामती' कडे वळला. मोदी व पवार समर्थकांमध्ये घमासान चर्चा सुरू झाली. मोठमोठ्याने शेरेबाजी आणि प्रत्युत्तर देण्याची झुंज लागली. अगदी या नेत्यांनासुद्धा ठाऊक नसतील अशा विषयांना ऊत आला. बाचाबाची सुरू झाली आणि वातावरण तापले. त्यातील एक गट, त्यांचे स्टेशन निघून गेल्याचे लक्षात येताच भानावर आला, 'कशाला चर्चा करीत बसलो,' असा पश्चात्ताप करीत ती मंडळी धुसमुसत उतरली. समर्थ रामदास स्वामी म्हणतात -

समूळ ग्रंथ लिहिल्यावीण । उगाच ठेवी जो दूषण ।
गुण सांगता पाहे अवगुण । तो एक पढतमूर्ख ॥

विषयाची पूर्ण माहिती नसताना आपण आपली मतं मांडतो, निंदा करतो. सतत दुसऱ्यांशी तुलना करून त्यांच्या दोषांची आपण जाहिरात करतो. एखादी व्यक्ती 'अशी का वागते' याची पार्श्वभूमी लक्षात न घेता लगेच Character Certificate देऊन आपण मोकळे होतो. असेच जर तुमच्याबाबतीत कुणी वागले तर? सतत निंदा करणे, हीन लेखणे व अफवा पसरवणे याची प्रमुख कारणे म्हणजे -

१) असुरक्षिततेची भावना - दुसऱ्याला कमी लेखून व्यक्ती स्वत:ची प्रतिमा बळकट करण्याचा निष्फळ प्रयत्न करते. उदा. नुकतीच कार्यालयात बढती मिळालेल्या सहकाऱ्याच्या चारित्र्यासंबंधी अफवा पसरवणे.

२) स्वत:चे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी, छाप पाडण्यासाठी, समवैचारिक गटात सहभागी होण्यासाठी. उदा. सासूचा तिटकारा असणारी स्त्री समानानुभव असणाऱ्या इतर सुनांशी सासूबद्दल नकारात्मक चर्चा करून मैत्रीपूर्ण बंध स्थापित करते.

३) दुसऱ्यांच्या प्रगतीविषयी/ सदगुणांविषयी मत्सर, द्वेष स्वत:मधील कमतरता झाकण्यासाठी. उदा. प्रेमभंग झालेला तरुण 'सर्व मुली अशाच असतात' असे आपल्या मित्रांना वारंवार बजावतो. प्रत्येक वेळी 'शितावरून भाताची परीक्षा' योग्य नाही. पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन हासुद्धा एक प्रमुख दोष आहे. अमुक व्यक्ती विशिष्ट पद्धतीनेच

वागते असे गृहीत धरले जाते आणि तिची खिल्ली उडविली जाते. उदा. पुणेरी पाट्या व संता-बंता हे सरदार वृत्तींवर होणारे विनोद असोत वा राजकारण्यांवर होणारी शेरेबाजी. अशा नकारात्मक चर्चा, अफवा, टीका यांचे परिणाम वाईट ठरतात. मैत्रीपूर्ण संबंध बिघडू शकतात (तडा जातो). एखाद्याचा आत्मविश्वास कमी होतो. सामाजिक प्रतिमा मलिन होते. मित्रांनो, लक्षात घ्या 'No one is perfect.' दुसऱ्यांच्या दोषांचा पाढा वाचण्यापेक्षा आत्मपरीक्षण व स्वयंसुधारणा निश्चितच बरी. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे या वायफळ गप्पांमुळे होणारे मोठे नुकसान, म्हणजे वेळ वाया जातो. ज्याप्रमाणे कोकणात 'रस्त्यांमध्ये खड्डे आहेत की खड्ड्यांमध्ये रस्ते आहेत' हा संशय निर्माण होतो त्याचप्रमाणे कामातून वेळ मिळालाच तर गप्पा मारण्यापेक्षा पोटभर गप्पा मारून वेळ मिळालाच तर काम करण्याची वृत्ती हमखास दिसते.

कोणतीही टीका वा चर्चा ही विधायक (Constructive) असावी. दुसऱ्यांचे मनोबल खच्चीकरण करण्यापेक्षा योग्य ती टिपणी करून समोरच्याला सुधारण्याची संधी द्यावी. केवळ एखाद्या व्यक्तीच्या बाह्य रूपावरून कयास बांधू नये. तथ्य जाणून घ्या. नकारात्मक चर्चा करणाऱ्या व अफवा पसरवणाऱ्या लोकांना प्रोत्साहन व समर्थन देऊ नये. कालांतराने ते तुमच्याबद्दलही अफवा पसरविण्याची शक्यता जास्त! कोणत्याही चर्चेत सहभागी होताना एक सूत्र लक्षात घ्या - मी जे बोलत आहे ते सत्य आहे का? उपयुक्त आहे का? यामुळे कुणाचे नुकसान होऊ शकते का? सामंजस्य व सहनशीलतेने अनेक स्वभावदोष सुधारता येतात. समर्थ रामदासांच्या शब्दांत मांडायचे झाले तर -

**आपणास चिमोटा घेतला । तेणे कासावीस झाला ।**
**आपणावरून दुसऱ्याला । राखत जावे ॥**

**ज्योती सीताराम शिंदे**
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय,
वेळणेश्वर

(पृष्ठ क्र. २३ वरून **मेंदू : एक दिशादर्शक**)

आपणां सर्वांनाच ठाऊक आहे की एक अज्ञात महाशक्ती सृष्टी आणि मानवी जगाचे नियंत्रण करते, जिला सामान्य माणूस 'परमेश्वर' म्हणतो. म्हणूनच आपण हा इहलोक केव्हा सोडायचा ते आपण ठरवू शकत नाही. राजवैभवात लोळत असलेला सिद्धार्थ (गौतम बुद्ध), मोहनदास करमचंद गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, बाबा आमटे आणि असे असंख्य यांच्या बाबतीत त्या अज्ञात महाशक्तीने त्यांच्या मेंदूला एका क्षणी संदेश दिला, ''उठा, तुमच्याकडून वेगळे कार्य घडणार आहे.'' मग त्यांची सुखवस्तू जीवनपद्धतीच बदलून गेली आणि त्यांनी केलेले कार्य समाजास वरदान ठरले. जागतिक पातळीवरचे लोककल्याणकार्य घडले.

असा हा आपला कर्ताकरविता मेंदू! तो संदेश देईल त्या दिशेने मार्गस्थ व्हायचे. विलक्षण दिशादर्शक. त्यास मनापासून प्रणाम.

**मनोहर तळेकर**
२, सुयोग, राममारुती रोड,
क्रॉस लेन नं.३, नौपाडा,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०२

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय : एक दृष्टिक्षेप

*महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीची अग्रगण्य संस्था म्हणजे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय. १९९८ साली या ग्रंथालयाने आपला शताब्दी सोहळा साजरा केला. बडोदा संस्थानचे अधिपती महाराजा सयाजीराव गायकवाडांसारखे आश्रयदाते लाभलेल्या या संस्थेने अनेक दिग्गज संशोधक, लेखक, साहित्यिक आणि प्राध्यापक घडवले. अशा या प्रदीर्घ वैभवशाली परंपरा लाभलेल्या या संस्थेच्या परंपरेचा व इतिहासाचा हा धांडोळा - संपादक*

१८९८ साली मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना होण्यापूर्वी अनेक वर्षे सार्वजनिक ग्रंथालयांची प्रथा महाराष्ट्रात थोडीफार रूढ झाली होती. समाजसेवा करण्याची आकांक्षा ज्यांच्या मनात बीजरूपाने असते त्या संस्थेचे आजचे भव्य स्वरूप पाहून संस्थापकांनी मोठ्या दूरदृष्टीने जाणीवपूर्वक संग्रहालयाची विशिष्ट स्वरूपात स्थापना केलेली दिसून येते. लोकसेवेच्या हेतूने प्रेरित झालेल्या काही तरुणांनी ''भारत सेवक समूह'' इ. स. १८९५ या वर्षी ''श्री छत्रपती वाचनालय'' या नावाने मराठी पुस्तक ओळखीच्या आपल्या महाराष्ट्र बांधवांस वाचावयास देण्यासाठी  एक संस्था स्थापन केली. संग्रह फक्त मराठी ग्रंथांचा होता. सदर उपक्रम दोन वर्षे नीटपणे चालू राहिला. प्लेगच्या साथीने सदर उपक्रमाला जरा खीळ बसली; परंतु पुन्हा खटपट सुरू झाली. वाचनालयाचे महत्त्व पटवण्यासाठी समाजामध्ये अभिप्राय घेण्याचे ठरवण्यात आले. त्याचप्रमाणे संस्थेसाठी रा. सा. पावगी यांच्याकडून मासिक द्रव्यसाहाय्य मिळवण्यात मंडळी यशस्वी झाली. अशा विविध प्रकारांची द्रव्यसाहाय्यांची आश्वासने व मोठ्यांचे पाठबळ मिळवण्यास कार्यकर्ते यशस्वी झाले.

संग्रहालयाचे महत्त्वाचे भांडवल हे संस्थेचे स्वावलंबी निष्ठावान सेवक हे होय. मोडक, शेजवलकर व पुणतांबेकर यांनी आणखी साहाय्यकांची फौज तयार करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. हळूहळू नारायण कृ. गद्रे, मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, अनंत नीळकंठ पिटकर, नारायण महादेव बाक्रे, नरहर महादेव जोशी, विठ्ठल वा. टिल्लू, विनायक ब. जोशी व गणेश लक्ष्मण पागे अशी समविचारी मंडळी एकत्र येऊ लागली. संस्थेचे नियम, पुस्तक, पावत्या, अर्ज अशी प्राथिमक स्वरूपाच्या कामकाजाची रीतसर आखणी झाल्यावर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या स्थापनेचा समारंभ श्रावण शु. १५ शके १८२०, दि. १ ऑगस्ट, १८९८ या दिवशी सकाळी झाला. आणि संग्रहालयाच्या श्रीगणेशाला सुरूवात झाली. या वेळी सुप्रसिद्ध लेखक शिवचरित्रकार कृ. अ. केळुसकर यांनी संग्रहालयाचे व ग्रंथांचे महत्त्व पटवून दिले. संस्था नारळी पौर्णिमेच्या दिवशी सुरू झालेली होती. संस्थेची ''ग्रंथसंग्रहा'' ची जागा ठाकुरद्वार, धुसवाडी टुलुंचे घर. त्या वेळी ग्रंथसंग्रह हा ३०० पर्यंत होता. संग्रहालयातील संस्थापकांची अशी प्रतिज्ञा होती की, संग्रहालयात मराठी भाषेत पूर्वी जितकी पुस्तके प्रसिद्ध झाली असतील व पुढे प्रसिद्ध होतील त्या पुस्तकांचा व दुर्मीळ हस्तलिखितांचा संग्रह करावा.

संस्थापकांमध्ये सारे जण सर्वसामान्य असे कार्यकर्ते होते. सार्वजनिक चळवळीत वावरणारे. समाजसेवेची तळमळ आणि स्वयंसेवकी भावना असणारी मंडळी होती. कार्यकर्त्यांची जिद्द आणि उत्साह व काही थोरांचा आशीर्वाद या सर्व संस्थेच्या जमेच्या बाजू होत्या. संग्रहालयाला सुरुवातीच्या काळात अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. या सर्व भेटींत विशेष महत्त्वाची व्यक्ती होती ती बडोदे संस्थानचे अधिपती सयाजीराव महाराज. १८ नोव्हेंबर, १९०६ रोजी संस्थेशी त्यांचा आलेला संबंध हा कायम टिकला. 'ह्या संस्थेचा जीव काय तो ग्रंथसंग्रह आहे'

कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल, तर अपयश पचविण्यास शिका.

असे मत संस्थेच्या पहिल्या अहवालात व्यक्त करण्यात आले आणि त्यानुसार समाजातील अनेक लोकांकडून ग्रंथ मिळवण्यासाठी आवाहन करण्यात आले.

ग्रंथकारांकडे विनंतिपत्र पाठविणे आणि त्यांच्याकडून ग्रंथ मिळवणे हा उपक्रम सातत्याने १९३० पर्यंत चालू होता. शेट तुकाराम जावजी, विनायक कोंडदेव ओक, नारायण गोविंद माडगावकर, का. र. मित्र असे अनेक समकालीन थोर लोक संस्थेला ग्रंथ देत होते. संस्थेच्या प्रेमापोटी संस्था सभासद आत्माराम रावजी जगताप त्यांच्या मृत्यूपर्यंत संस्थेला ग्रंथ देणगी देत होते. ग्रंथांसोबत अनेक मासिकेदेखील गोळा करण्यात आलेली आहेत. परचुरे, पुराणिक अशांनीदेखील संस्थेला ग्रंथ भेट दिले होते. मुंबईचे इंदुप्रकाश, सुबोधपत्रिका, देशसेवक, ज्ञानोदय, ख्रिस्ती नागरिक, विश्वबंधु इत्यादी नियतकालिकेदेखील संस्थेस भेट देण्यात आली. अनेक लहानमोठ्या संस्थांनीदेखील आपल्यापरीने संस्थेला ग्रंथ भेट दिलेले होते. ग्रंथसंग्रह समृद्ध करण्यासाठी विशेष लक्ष पुरविले गेले. संस्थेचा विकास व वाढ होण्याच्या दृष्टीने सुरवातीच्या काही वर्षांतच जागेची अडचण जाणवू लागली.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा ग्रंथसंग्रह सर्व अंगांनी समृद्ध होत होता. व्यक्तिगत ग्रंथदानाप्रमाणेच विविध प्रकाशकांकडूनही ग्रंथ देणगी स्वरूपात मिळत होते. भाटे आणि मंडळी, शेट तुकाराम जावजी, बाळवंत गणेश दाभोळकर, दामोदर सावळाराम इ. अनेकांनी संस्थेचा ग्रंथसंग्रह वाढावा यासाठी प्रयत्न केले. ग्रंथांची मदत करण्यात अनेक लहान मोठ्या संस्थांचा वाटादेखील फार मोठा होता. ठाण्याचे मराठी ग्रंथसंग्रहालय, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसासटी, मराठी ऐक्येच्छू सभा, कित्तेभंडारी ऐक्यवर्धक मंडळी इ. सारख्या अनेक नामवंत संस्थांनी विविध प्रकारचे ग्रंथ देऊन संस्थेच्या ग्रंथसमृद्धीसाठी हातभार लावला. प्रा. अ. का. प्रियोळकर, शं. ग. दाते त्याचप्रमाणे वि. दा. सावरकर यांनीही दुर्मीळ आणि बहुमूल्य ग्रंथ देणगी म्हणून दिले.

संस्थेच्या खर्चाच्या प्रमुख बाबी म्हणजे जागेचे भाडे, पुस्तक खरेदी व नोकरांचा पगार ह्याच होत्या. त्यातही स्वतःची इमारत नसल्यामुळे भाडेखर्चाला अग्रस्थान द्यावे लागे. संस्थेला उत्पन्नाचा एक प्रमुख मार्ग म्हणजे संस्थेसाठी देणग्या गोळा करणे. तसेच हयात सभासद व आश्रयदाते करून घेण्याच्या गरजेमुळे अनेक मान्यवरांनी संस्थेस सढळ हस्ते देणग्या दिल्या. भिवाजी तानाजी पाटील, महादेव रामचंद्र तुळमुळे इ. अनेक ग्रंथप्रेमींनी आपल्यापरीने देणगी दिली. संस्थेचा पहिला वार्षिक समारंभ न्या. मू. रानडे ह्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. संस्थेच्या पहिल्या वार्षिक उत्सवाच्या निमित्तान अनेक विद्वान मंडळींच्या व्याख्यानमाला चालू झाल्या. संस्थेची स्वतःची इमारत उभारण्याकडे चालकांचे विशेष लक्ष वेधले गेले. बडोद्याचे अधिपती श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या इमारतीसाठी साहाय्य देण्याच्या आश्वासनामुळे चालना मिळाली. १८ ऑक्टोबर, १९०६ रोजी संस्थेच्या इमारत फंडाला सुरूवात झाली. त्यासाठी विविध कार्यक्रम आखण्यात आले. विविध नाटकांचे प्रयोग करण्यात आले.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेच्या आजपर्यंत एकंदर इतिहासातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे संग्रहालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ दि. १७ डिसेंबर, १९१० रोजी झाला. समारंभास संस्थेचे आश्रयदाते, हयात वर्गणीदार, वर्गणीदार व इतर मिळून हजारो संखेने लोक जमले होते. ह्या वेळी श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड यांस संस्थेच्या वतीने मानपत्र अर्पण करण्यात आले. इमारत पूर्ण झाल्यावर विजयादशमीच्या साडेतीन मुहूर्तावर संग्रहालयाचे नव्या इमारतीत स्थलांतर झाले. ७ नोव्हेंबर, १९१२ रोजी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याच शुभहस्ते इमारतीच्या उद्घाटनाचा आणि इमारतीची कोनशिलाही बसविण्याचा कार्यक्रम पार पडला. तसेच 'श्रीशारदा मंदिरा'चे महाद्वार उघडण्याचा अपूर्व थाटाचा समारंभ झाला. इमारतीचे सर्व इंजीनियरिंग काम सदाशिव नानाभाई हाटे ह्यांनी संग्रहालयासाठी

स्वतःच्या चुकांवर पांघरुण घालण्यासाठी मनुष्य इतरांच्या त्रुटींकडे लक्ष वेधतो.

विनामूल्य करून दिले. संस्थेला स्वत:ची इमारत लाभल्यामुळे प्रगतीस हातभार लागला. भाड्याचे उत्पन्न कमी असूनही उपयुक्त ठरत होते. संग्रहालयाची स्वत:ची इमारत उभी राहिली, परंतु अनंत अडचणी वाढत गेल्या. संग्रहालयाची इमारत बांधताना चालकांची पूर्ण चार मजल्यांची इमारत बांधण्याचा संकल्प करून तेवढ्या मजबुतीचा पाया घातला होता. मूळ संकल्प प्रत्यक्षात येण्यासाठी १९५४ हे वर्ष उजाडले. म्हणजे सुमारे ४५ वर्षे, संस्थेला विद्वन्मंडळातही मान्यता व प्रतिष्ठा मिळत असल्याचा अनुभव १९१८ साली आला. या वर्षी मुंबई विद्यापीठाची एम. ए. ची तोंडी परीक्षा ग्रंथसंग्रहालयात प्रथम घेण्यात आली. सदर प्रथा पुढे बरीच वर्षे चालू राहिली. तसेच १९२२ सालापासून सामान्य सभासदांना व्यवस्थापक मंडळात प्रथमच प्रतिनिधित्व मिळाले. संस्थेच्या जीवनातील एक विशेष उल्लेखनीय व अभिमानाची घटना म्हणजे रौप्यमहोत्सव समारंभ. १९२३ साली संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली.

रौप्यमहोत्सव त्या वेळचे केसरीकर साहित्यसम्राट न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने पार पडला. त्याचप्रमाणे वि. ल. भावे यांच्या व्याख्यानाच्या माध्यमातून प्रथमच महानुभाव पंथाची आणि त्या पंथातील ग्रंथकारांनी निर्माण केलेल्या प्रचंड व मौल्यवान वाङ्मयाची माहिती महाराष्ट्राला जाहीरपणे मिळाली. संस्थेच्या वाढीबरोबर आर्थिक अडचण वाढतच होती. अशा वेळी सरकार वा महानगरपालिका यांच्याकडून साहाय्य मिळविण्याचा प्रयत्न केला गेला. १९३५ सालापासून नवीन कार्यक्रम सुरू करण्यात आला होता. विविध प्रकारच्या व्याख्यानमाला सुरू केल्या गेल्या. १९३६ ते १९५० या कालखंडात संस्थेच्या कार्यकर्त्यांना बराच संघर्ष करावा लागला होता. आर्थिक लाभाच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिकेकडून वार्षिक अनुदान मिळू लागले. त्याचप्रमाणे संस्थेमार्फत विविध संस्मरणीय उपक्रमदेखील राबविण्यात आले होते. संस्थेतर्फे होणाऱ्या कार्यक्रमांत १९४१ साली दादर व १९४३ साली लॅमिंग्टन रोड शाखा निघाल्यावर अधिकच भर पडली. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी एक 'अभ्यासमंडळ' स्थापन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी संस्थेतील ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आले.

वाङ्मयीन उपक्रमांप्रमाणे इतर क्षेत्रांतील कार्यक्रमांबाबत विचार केला गेला. ग्रंथालय चळवळीतही संस्थेचे कार्यकर्ते व संस्था भाग घेऊ लागली. १९३९ ते १९४५ या काळात ग्रंथालय, ग्रंथालय चळवळींशी निगडित अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. कार्यवाह श्री. भट यांच्या सूचनेवरून 'मराठी ग्रंथ संग्राहक' नावाची मासिक पत्रिका काढण्याचा उपक्रम संस्थेने १९४५ साली सुरू केला. संग्रहालयाच्या कार्याला अशी गती प्राप्त झाल्यामुळे सभासदसंख्येतही चांगली वाढ होत होती. १९४८ च्या आरंभी मराठी संशोधन मंडळाच्या कार्याला प्रारंभ झाला. १९५३ मध्ये 'मराठी संशोधन पत्रिका' हे मंडळाचे त्रैमासिक मुखपत्र सुरू झाले. १९५६ साली मंडळाची पदव्युत्तर मागदर्शनाचे केंद्र म्हणून मिळालेली मान्यता कायम करण्यात आली. १९४८ ते १९६८ पर्यंत अनेक थोर मंडळी संस्थेस संचालक म्हणून लाभली. १९६८ साली मराठी वाङ्मयकोश तयार करण्याचे व्यापक कार्य हाती घेण्यात आले. याच कालखंडात अनेक होतकरू आणि संस्थेवर मनापासून प्रेम करणारे महत्त्वाच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या अकाली मृत्यूने संस्था मुकली होती. संस्थेचा सुवर्णमहोत्सव जवळ यावा आणि अशा दु:खद घटना घडाव्यात ही दुर्दैवाची गोष्ट होती. १ ऑगस्ट, १९४८ रोजी संस्थेस ५० वर्षे पूर्ण झाली होती व संस्था ५१ व्या वर्षात पदार्पण करत होती. सुवर्णमहोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या जोशात साजरा करण्यात आला. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन दि. १२ मार्च १९४९ रोजी त्या वेळचे मुंबईचे राज्यपाल श्री. महाराजसिंग यांच्या हस्ते करण्यात आले होते. विविध करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. महोत्सवाचा समारोप बडोद्याचे

दु:ख कवटाळत बसू नका; ते विसरा आणि सदैव हसत रहा.

श्री. प्रतापसिंह महाराज गायकवाड यांच्या हस्ते २६ मार्च, १९४८ रोजी झाला.

अशा विविध अंगांनी संस्थेचा व्याप वाढत होता. संस्थेची वाढ होत होती. वाढता व्याप लक्षात घेता, कामकाज व्यवस्थित पार पडावे यासाठी संस्थेची घटना निर्माण झाली. वेळप्रसंगी संस्थेच्या घटनेत व त्या वेळच्या परिस्थितीनुसार विविध बदल झाल्यावर १९५१ साली निवडणुका झाल्या व संस्थेच्या चालक मंडळीत काही महत्त्वाचे बदल करण्यात आले. १९५१ सालातच परळ, कुर्ला व कुलाबा शाखांची स्थापना करण्यात आली. मराठी संशोधन मंडळाप्रमाणेच मुंबईतील इतिहास संशोधनाची उणीव दूर करण्याच्या दृष्टीने १९५७ ते १९५८ साली प्रा. न. र. फाटक यांच्या प्रेरणेने इतिहास संशोधन मंडळाची स्थापना करण्यात आली. १९५९ साली कलामंडळाची स्थापना करण्यात आली. तसेच लहान मुलांच्या विकासासाठी सानेगुरुजी बाल विकास मंदिर या संस्थेला संग्रहालयाने आपल्यामध्ये सामावून घेतले. सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे १९६० नंतरच्या कालखंडात मुंबई महापालिकेची वाचनालये चालविण्याची जबाबदारी संग्रहालयाकडे देण्यात आली. १९५८ सालीच संस्थेने एक उपक्रम राबविला. बहारीन या इराणी आखातील शहरात अनेक महाराष्ट्रीय कुटुंबांसाठी संग्रहालयाने मराठी ग्रंथ नियमित पुरविण्यास सुरुवात केली. सुमारे तीन-चार वर्षे हा उपक्रम व्यवस्थित चालू होता. परंतु काही कारणास्तव सदर उपक्रम बंद करावा लागला. तसेच अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील आशिया फाउंडेशन या संस्थेने सर्जनशील साहित्याच्या प्रकाशन योजनेसाठी संग्रहालयाला ३६१२ डॉलर्सची देणगी दिली होती. अशा विविध उपक्रमांनी संस्थेच्या कार्याला चौफेर गती मिळत होती. संस्थेच्या हीरकमहोत्सवानिमित्ताने अनेक विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमावर कळस चढविला तो भारताचे त्या वेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दि. १० मार्च, १९५९ रोजीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने. दादर येथील संस्थेच्या नवीन इमारतीची कोनशिला बसविण्याच्या कार्यक्रम पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आला.

ग्रंथालयाच्या कार्यकर्त्यांमध्ये विविध नवनवीन संकल्पना राबविण्याचा प्रयत्न सतत होत होता. त्यांपैकीच एक म्हणजे संग्रहालयाच्या शाखा उघडण्याचा होय. सततच्या प्रयत्नाने दि. ५ जानेवारी, १९४१ रोजी दादर शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले आणि बघता बघता दि.२५ जानेवारी, १९४२ रोजी दादर शाखेने आपला पहिला वाढदिवस साजरा केला. त्याचप्रमाणे लॅमिंग्टन रोड शाखेची सुरुवात दि. ७ मे १९४३ रोजी झाली. दि. २९ एप्रिल, १९५२ रोजी परळ येथे आर. एम. भट हायस्कूलच्या सहकार्याने संस्थेची शाखा उघडण्यात आली. संस्थेच्या कुर्ला येथील शाखेचे उद्‌घाटन दि. १४ जानेवारी, १९५२ रोजी झाले. तर कुलाबा येथील शाखेचे उद्‌घाटन दि. १९ जानेवारी, १९५२ रोजी झाले. शाखा आणि केंद्रे या कल्पनांना चांगला प्रतिसाद लाभल्यामुळे संग्रहालय विभाग आणि वाचनालय विभाग स्वतंत्र करण्याची गरज निर्माण झाली. यामुळे ठाकुरद्वार येथील वाचनालय विभागाला १९५१ पासून इतर शाखांप्रमाणे स्वरूप देण्यात आले. एक सांस्कृति केंद्र म्हणून ग्रंथालयाचा विकास केला पाहिजे अशी कल्पना मूळ धरू लागली. या जाणिवेचा विचार करता दि. ११ जून १९५३ रोजी कै. सानेगुरुजींच्या पुण्यतिथीनिमित्ताने आंतरभारती केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच मराठी संशोधन मंडळाच्या जोडीला संस्थेने इतिहास मंडळाची स्थापना केली. मंडळाचे रीतसर उद्‌घाटन दि.२७ जून, १९५८ रोजी करण्यात आले. संशोधन कार्याप्रमाणेच कलाविषयक अंगाचीही जोड मिळावी म्हणून दि. १९ मे १९५८ रोजी 'कलामंडळ' या आणखी एका नवीन शाखेची सुरुवात करण्यात आली. या कलामंडळाच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या संस्थेच्या माध्यमातून 'भारत नाट्य सहकार संघ'

---

मळलेल्या वाटा अधोगतीला कधीही नेत नाही. हे जितकं खरे तितकेच त्या प्रगतिचा मार्ग दाखवीत नाही. हे ही खरं.

या सहकारी संघटनेची स्थापना करण्यात आली. बालवाचकांच्या वाचनाची व त्यांच्या विविध छंदांची जोपासना करण्यासाठी ताडदेव येथील सानेगुरुजी बालविकास मंदिर ही संस्था १९५९ साली संग्रहालयात सामील करण्यात आली. दि. २४ डिसेंबर, १९५९ रोजी 'सानेगुरुजी बालविकास मंदिर' शाखेचा उद्‌घाटन समारंभ साजरा करण्यात आला. या शाखेच्या वतीने मुंबईत २० बालवाचन केंद्रे चालू असून 'बालविकास' हे मासिकही शाखेतर्फे प्रसिद्ध होते.

महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या अनेक वसाहती मुंबई शहरात नव्याने निर्माण होत होत्या. या हजारो मराठी भाषिकांमुळे संस्थेच्या कार्याला पुष्कळ वाव होता. यासाठी १९६० साली मंडळाने संस्थेच्या विनंतीस मान देऊन आपल्या निरनिराळ्या वसाहतींत संस्थेस अत्यंत सवलतीच्या भाड्याने जागा देण्याचे मान्य केले. लगोलग वांद्रे, चेंबूर इत्यादी ठिकाणी संस्थेच्या शाखा काढण्यास विशेष चालना मिळाली. दि. १ ऑक्टोबर, १९६१ रोजी काळाचौकी शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले. दि. २ ऑक्टोबर, १९६२ रोजी चेंबूर शाखेचे उद्‌घाटन झाले व दि. १ ऑगस्ट, १९६३ रोजी घाटकोपर शाखेचे कामकाज सुरू झाले. दि. १४ मार्च, १९६४ रोजी बोरिवली येथे संस्थेच्या शाखा स्थापन झाल्या. १९६५ झाली मुलुंड शाखा निर्माण झाली. १९६८ साली विलेपार्ले व करी रोड शाखेची स्थापना झाली. १९६९ साली दहिसर, वरळी आणि गोरेगाव शाखेची स्थापना करण्यात आली. तर मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या एकूण तेरा वाचनालय शाखा व बारा बालवाचनालय केंद्रे संस्थेत समाविष्ट करण्यात आली. १९६५ पासून महानगरपालिकेने वाचनालयाचा संपूर्ण कारभार संस्थेकडे दिला. अशा प्रकारे एखाद्या संस्थेकडे आपल्या कामाची जबाबदारी सोपविण्याची ही पहिलीच वेळ आणि संग्रहालयासाठी प्रतिष्ठेची बाब होती. १९७० च्या दशकात संस्थेच्या ताब्यात महापालिकेची २० वाचनालये आलेली होती. कार्यविस्ताराच्या दृष्टीने संग्रहालयाला आणखी एक संधी प्राप्त झाली. दि. २३ जुलै, १९६५ रोजी पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात सूचिमंडळाचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. दि. १ ऑगस्ट, १९६५ पासून मंडळाचे कार्य रीतसर सुरू झाले. मुंबई महापालिकेची वाचनालये चालविण्याचे काम जसे संस्थेकडे आले त्याप्रमाणे दादर येथे असलेल्या 'पीपल्स फ्री रीडिंग रूम' या जुन्या ग्रंथालयाचे कामही संस्थेकडे सोपविण्यात आले. ग्रंथसंग्रहालयातर्फे चालविण्यात आलेले अभ्यासमंडळ हाही एक उपक्रमाचा भाग होता. त्याला जोड म्हणून लघुलेखन विद्यालय हाही एक शाखा स्वरूपाचा उपक्रम सुरू करण्यात आला. श्री. म. ना. दामले यांनी लघुलेखन शिक्षणाचा वर्ग १९६२-६३ साली सुरू केला. १९६८-७० या सालात वर्गाला शासनाची मान्यता मिळाली.

नव्या इमारतीमुळे आर्थिक व इतर कारणाने संस्थेला बरेच स्थैर्य मिळाल्याने ग्रंथालयाच्या सेवकवर्गासाठी वेतनश्रेणी ठरविण्याचा व सेवांबाबत निश्चित नियम करण्याचाही उपक्रम हाती घेण्यात आला. जागेअभावी संस्थेला नवीन ग्रंथांचा संग्रह करण्यास जागा अपुरी पडत होती. तसेच उपलब्ध संग्रह वाचकांना वाचनासाठी, अभ्यासासाठी देताना अडचणी येत होत्या. त्यासाठी ठाकुरद्वारहून काही ग्रंथ दादरच्या इमारतीच्या एका भागात हलविण्यात आले. त्याचप्रमाणे संग्रहालय विभागातील ग्रंथांचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण करण्याचे काम सुरू झाले. संग्रहालय विभागातील ग्रंथाचे १९५६-५७ साली व १९५७-५८ साली नियतकालिकांचे वर्गीकरण करण्यात आले. जागेअभावी या कामाच्या गतीला खीळ बसत होती. वर्गीकरणाच्या उपक्रमाप्रमाणेच अभ्यासकांच्या सोयीसाठी संदर्भ विभाग दररोज बारा तास उघडा ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. संदर्भ विभागाचा फायदा कोणाही संशोधकास विनामूल्य घेता येत होता. त्याचप्रमाणे अभ्यासकांच्या गरजा भागविण्याचा आटोकाट प्रयत्न होत होता. १९६१ साली ठाकुरद्वार येथून ग्रंथ हलविण्याचे काम चालू होते. सदर काम जानेवारी १९६२ मध्ये पूर्ण होऊन

संदर्भ विभागाचे काम नेहमीप्रमाणे सुरू झाले. तसेच वाचकाभिमुख असे इतर उपक्रम सुरू करण्यात आले. विविध व्यक्ती व विषयविशेषांवर विविध संदर्शने भरविण्यात येऊ लागली. एखाद्या लेखकाच्या वाङ्मयाची व त्याच्या वाङ्मयाविषयीच्या साहित्याची सूची तयार करण्याचे कामदेखील होत होते. श्री. गो. रा. परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली सूची तयार करण्याचे काम पार पडत होते. श्री. ह.ह. मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली १९६३-१९६४ साली संग्रहालयातर्फे आणखी एक उपक्रम हाती घेण्यात आला. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांची कात्रणे ठेवून त्याद्वारा वृत्तपत्रसंकलन विभाग चालू करण्यात आला. ४० वृत्तपत्रांतून विषयवारीने विविध विषयांचे संकलन करण्यात येत असे. परंतु काही अडचणीमुळे सदर उपक्रम राबविणे शक्य झाले नाही.

दोलामुद्रितांचा संग्रह हे एक संग्रहालयाचे खास वैशिष्ट्य होय. १८६७ साली ग्रंथनोंदणीचा कायदा झाला तेव्हापासून सरकारकडे सर्व पुस्तकांची व अन्य प्रकाशनांची नोंद होऊ लागली. म्हणून त्याआधीची मुद्रिते ही आद्यमुद्रिते किंवा दोलामुद्रिते होत. संग्रहालयात सध्या सुमारे ८९० दोलामुद्रिते आहेत. १९६४ साली महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, केसरी, रविवार सकाळ, साधना, रविवारचा मराठा या दैनिकांच्या दोन वर्षांच्या फाइली बांधून घेण्यात आल्या. अनेक उपक्रमांपैकी एक उपक्रम, संदर्भांच्या शोधात येणाऱ्या शोधकांना काही विशिष्ट क्षेत्रातील माहिती परस्पर व चटकन मिळावी या दृष्टीने 'संदर्भमंजूषा' उपक्रम हाती घेण्यात आला. संदर्भमंजूषेत विविध विषयांची माहिती देण्यासाठी तालिकापत्रे करण्यात आली. १. नियतकालिकातील लेखांची विषयवार सूची, २. महत्त्वाच्या विद्यमान साहित्य व्यक्तींचे, प्रामुख्याने साहित्यिकांचे पत्ते, ३. महत्त्वाच्या दिवंगत व्यक्तींचे जन्म व मृत्यू दिनांक, ४. नियतकालिकांच्या विशेषांकांच्या विषयवार नोंदी, ५. नियतकालिकांचे पत्ते, ६. संदर्भ विभागातील ग्रंथ वर्गीकरणाच्या विषयदर्शक नोंदी, ७. तात्कालिक व प्रासंगिक महत्त्वाच्या पुस्तिकांच्या विषयावार वर्णनात्मक नोंदी. अशा प्रकारची सोय मुंबईच्या दक्षिण भागातील वाचकांची गरज भागविण्यासाठी उपसंदर्भ विभाग, ठाकूरद्वार येथे सुरू करण्यात आली. त्या तेथील कामकाजासाठी काही मान्यवरांनी देणगीदेखील दिली. संस्थेच्या दादर येथील संदर्भ विभागाचे कार्यक्षेत्र व उपयुक्तता वाढावी यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. संदर्भासाठी व माहितीसाठी हमखास महाराष्ट्रीय व मराठी भाषिकांप्रमाणे अन्य भाषिक, महाराष्ट्राबाहेरून साहित्यविषयक, शास्त्रीय व सांस्कृतिक स्वरूपाच्या संदर्भ पृच्छा येत असतात. अशा अनेक विविध प्रश्नांना संदर्भ विभागाकडून तत्परतेने सर्वतोपरी मदत व सहकार्य दिले जाते. देशाच्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक संस्थांप्रमाणेच, जगाच्या विविध देशांतून त्या त्या देशाचे अभ्यासक, संशोधक संदर्भ विभागास भेट देत असतात. सदर सेवा ही प्रत्यक्ष भेटीने आणि दूरध्वनीद्वारेही दिली जाते. या सेवेत जिज्ञासू अभ्यासक, साहित्यिक, संशोधक, पत्रकार, विद्यार्थी, सर्वसामान्य वाचक, विविध शिक्षणसंस्था, साहित्यसंस्था, सांस्कृतिक समित्या, वृत्तसंस्था, सरकारी कार्यालये, सिनेमा निर्माते, इत्यादींचा समावेश असतो. संदर्भ विभागाच्या या सेवेप्रमाणेच संस्थेचे मराठी संशोधन मंडळ व इतिहास संशोधन मंडळ या संस्थेमार्फत संशोधक व अभ्यासक यांना संदर्भ देण्यावर भर असतो.

मुंबई शहराचा विस्तार वाढत गेल्यामुळे दूरदूरच्या वाचकांपर्यंत संस्थेचे कार्य पोचविणे व त्याबरोबरच एक सांस्कृतिक केंद्र म्हणून संस्थेचा विकास करणे असे नवीन, पण योग्य तो दर्जा कायम ठेवून योजनापूर्वक संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या संस्थेचे कार्य वाढविण्याचा प्रयत्न कायम होता. शाखाविस्ताराप्रमाणेच विविध व्याख्यानमाला, साहित्यिक चळवळ, ग्रंथालयविषयक उपक्रम इ. संस्थेच्या उद्दिष्टानुरूप वाढीस लावण्याचा प्रयत्न होत राहिला. महाराष्ट्र प्रबोधन आधार निधीसारखा उपक्रम,

या उपक्रमाद्वारे वाचकांना ग्रंथ उपलब्ध करून देण्याप्रमाणे ग्रंथनिर्मितीला हातभार लावण्याची कल्पना प्रमुख होती. जन्मशताब्दी या उपक्रमाद्वारे विविध कालखंडातील अनेक नामवंत साहित्यिकांच्या जन्मशताब्दीचे समारंभही संस्थेने व्याख्याने, संदर्शने इत्यादी आयोजित करून साजरे केले.

संग्रहालयाच्या शाखोपशाखा, मुंबई महानगरपालिकेची ग्रंथालये, संदर्भ विभाग, मध्यवर्ती कार्यालयातर्फे चालणारे नित्यनैमित्तक कार्यक्रम, इतर संस्थांना देण्यात येणारे सहकार्य यामुळे संस्थेच्या कार्याचा व्याप फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मुंबईच्या उपनगरासह हरएक विभागात संस्थेच्या शाखा काढण्याची महत्त्वाकांक्षा संस्थेने सतत नजरेसमोर ठेवली आहे. यामुळे संस्थेचे कार्यक्षेत्र दूरवर पसरलेले आहे. आज मुलुंड ते दहिसरपर्यंत संस्थेच्या शाखा आहेत. एकून बृहन्मुंबई आणि उपनगरे मिळून संस्थेच्या एकूण दहा, महानगरपालिकेच्या एकोणतीस व पाच स्वायत्त विभाग आहेत. या शाखांची दैनंदिन व्यवस्था सेवकांच्या सहकार्याने स्थानिक शाखा कार्यकर्त्यांकडून पाहण्यात येते. बहुसंख्य शाखा आणि विभागांतून ग्रंथ आणि नियतकालिकांची देवघेव, वृत्तपत्रांची स्थानिक सुविधा याखेरीज सभासदांच्या प्रबोधनासाठी सांस्कृतिक उपक्रम केले जातात.

सन १९८४ रोजी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास महाराष्ट्र शासनाच्या वतीने उत्कृष्ट ग्रंथालय योजनांतर्गत ‘अ’ वर्गातील सार्वजनिक व शासनमान्य ग्रंथालयांना देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार दि. १४ एप्रिल रोजी प्राप्त झाला. वर्ष १९९२ या कालखंडात तत्कालीन महाराष्ट्र शासनाने रुपये पंचवीस लाख अर्थसाहाय्य केले. त्याप्रमाणे वर्ष १९९८ या काळात संस्थेच्या शताब्दी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून आलेल्या मा. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी रुपये पन्नास लाखांची देणगी जाहीर केली. १९९७-९८ या कालखंडात वैशिष्टयपूर्ण घटना घडली ती म्हणजे संदर्भ विभागाच्या संगणकीकरणाची झालेली सुरुवात. काही तज्ज्ञांच्या सहाय्याने संदर्भात उपयुक्त अशी सॉफ्टवेअर बनवून घेतली. त्याचप्रमाणे संग्रही असलेल्या ग्रंथांना कसर आणि वाळवी यांपासून धोका जाणवू लागला. त्यांचा प्रतिबंध करण्यासाठी ओव्याचा धूर तयार करून त्या धुरात बंद काचेच्या पेटीमध्ये (थॉयमॉल चेंबर्स) पुस्तके ठेवण्यात सुरुवात करण्यात आली. ग्रंथांचे जतन व संरक्षण या अत्यंत महत्वाच्या बाबींचा विचार करण्यात आला. प्रथमच अशा प्रकारची ही योजना अमलात आणण्यात आली. तसेच मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिर न्यासातर्फे रु. २५ लाखांच्या देणगीमधून १५ लाख प्राप्त झाले. त्या काळातील मायक्रोफिल्मिंग हे तंत्रज्ञान ग्रंथजतनासाठी वापरण्यात आले. या मायक्रोफिल्मिंग प्रक्रियेमध्ये जुन्या ग्रंथांच्या फिल्म्स काढून ग्रंथांच्या जतनाची सोय होऊ लागली. तसेच मुंबईतील श्रीमहालक्ष्मी न्यासाकडूनदेखील दोन लाखांची देणगी देण्यात आली. संस्थेने शताब्दी वर्षात मुंबईतील नामांकित संस्थांच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. चित्रमय प्रदर्शन, मान्यवरांची विविध विषयांवर व्याख्याने, असे अनेक विविध कार्यक्रम राबविण्यात आले. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा १०१ वा वार्षिक सोहळा व शताब्दी सांगता सोहळा शनिवार दि. २० मार्च, १९९९ रोजी संस्थेच्या शारदामंगल सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते कविवर्य प्रा. वसंत बापट, प्रमुख पाहुण्या म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा सौ. वसुंधरा पेंडसे नाईक होत्या. संस्थेचे अध्यक्ष श्री. शरदचंद्र पवार हे आवर्जून उपस्थित होते. याच दिवशी नेहरू विज्ञान सेंटर संस्थेतर्फे रु. ५,००,००० /- व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे रु.२,५०,०००/- अशा देणग्या जाहीर केल्या गेल्या.

**संतोष पांगे**

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०१४-१५ :**

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५वी | १९ | १९ |
| ८वी | २७ | २१ |
| १०वी | ३६ | ३४ |

सर्वांत जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| ५ वी | मिहीर गोरे | ९२ | तालुका स्तरीय १ला क्रमांक |
| ८ वी | उर्वी गुप्ते<br>अमय कढे | ८० | |
| १० वी | विनीत मोरे | ७६ | |

**एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१४-२०१५ :**

एलिमेंटरी श्रेणी परीक्षा - ९७.४३%
एकूण विद्यार्थी - ३९
उत्तीर्ण विद्यार्थी - ३८
'अ' श्रेणी - ५
'ब' श्रेणी - ५
'क' श्रेणी - २८

इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा - ९६.९६%
एकूण विद्यार्थी - ३३
उत्तीर्ण विद्यार्थी - ३२
'अ' श्रेणी - ३
'ब' श्रेणी - ८
'क' श्रेणी - २१

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१४-२०१५**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५वी | बालबोधिनी | १६ | ०१ | १२ | ०१ | ०२ |
| ६वी | प्राथमिक | १२ | ०४ | ०५ | ०१ | ०२ |
| ७वी | प्रवेशिका | ०८ | - | ०६ | ०२ | - |
| ८वी | सुबोध | ०४ | - | ०२ | ०२ | - |
| ९वी | प्रबोध | ०२ | - | - | ०१ | ०१ |

**NSTSE युनिफाइड कॉन्सिल परीक्षा - २०१५ निकाल : १००%**

संक्षिप्त निकाल :

| इयत्ता | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | ८ | ८ |
| ६ वी | ३ | ३ |
| ७ वी | २ | २ |
| ८ वी | ४ | ४ |
| एकूण | १७ | १७ |

राज्यस्तरीय निवड झालेले विद्यार्थी :

इ. ५वी - मिहीर गोरे - ५५ वा क्रमांक

इ. ६वी - ईशान मलिये - २०७ वा क्रमांक

इ. ७ वी - विश्वराज बोरकर - १३० वा क्रमांक

इ. ८ वी - विघ्नेश कदम - ३२८ वा क्रमांक

**COE (Cyber Olympiad Exam) युनिफाइड कॉन्सिल परीक्षा - २०१५ निकाल :**

मिहीर बाम या विद्यार्थ्याने दुसरी फेरी पार केली.

**IGB Learning आयोजित Geography Olympiad २०१४-२०१५चा निकाल :**

विश्वराज बोरकर - सुवर्णपदक

ईशान मलिये - रजतपदक

सोहम दळवी - कांस्यपदक

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### डॉ. वा. ना. बेडेकर आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा २०१५

जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि.२० फेब्रुवारी रोजी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले गेले. स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष असतानादेखील स्पर्धेला राज्यभरातून स्पर्धकांचा प्रतिसाद मिळाला. पुणे, नाशिक, सातारा, रत्नागिरी तसेच ठाणे, मुंबई परिसरातून स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेतील प्राथमिक फेरीसाठी १) 'भारत स्वच्छता अभियान : स्वप्न की वास्तव', २) 'स्त्री-समानता फक्त कागदावरच' ३) 'सोशल मीडिया : संवाद की विसंवाद' हे तीन विषय देण्यात आले होते. स्पर्धेसाठी सुप्रसिद्ध कथाकथनकार लेखिका (श्वास फेम) माधवी घारपुरे, सूत्रसंचालिका व वृत्तनिवेदिका वासंती वर्तक आणि ज्येष्ठ पत्रकार रवींद्र मांजरेकर हे परीक्षक म्हणून लाभले होते. स्पर्धेचे उद्घाटन 'लोकमत'च्या ठाणे आवृत्तीचे निवासी संपादक नंदकुमार टेणी व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या हस्ते पार पडले. प्राथमिक फेरीतून पाच स्पर्धक संघांना अंतिम फेरीसाठी पात्र ठरविण्यात आले.

अंतिम फेरीतील पाचही स्पर्धक संघांना 'अच्छे दिन आलेत?', 'प्रसारमाध्यमांची आक्रमकता पूरक की मारक?', 'आम्ही विद्यार्थी ज्ञानार्थी की परीक्षार्थी', 'उत्सव हवेत की उत्सवांचे इव्हेंट?', 'सेन्सॉरशिप हवी की नको?' असे विविध विषय देण्यात आले होते. यात अंतिम फेरीतून पहिल्या डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत पुण्याच्या स. प. महाविद्यालयाच्या अभिषेक घैसास व मयुरेश शेंदुर्णीकर यांनी रु.५०००/- रोख आणि सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिक जिंकत या स्पर्धेच्या विजेतेपदावर नाव कोरले. दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक रु.३०००/- रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र साताऱ्याच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या किरण कीर्तीकर व मिथुन माने या स्पर्धक जोडीने जिंकले. तर तृतीय क्रमांकाचे रु. २०००/- - रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र हे पारितोषिक जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या आशिष शिंदे आणि पंकज चव्हाण यांनी पटकावले. उत्तेजनार्थ पारितोषिक रुईया महाविद्यालयाच्या प्रियंका तुपे व संजय दाभोळकर आणि साठ्ये महाविद्यालयाच्या सौरभ नाईक व अमृता बने यांनी पटकावले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह व स्पर्धेचे परीक्षक यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला.

या वेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी स्पर्धेचा आढावा घेत वादविवाद स्पर्धेच्या आयोजनामागची भूमिका विशद केली. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. विमुक्ता राजे, प्रा. महेश पाटील सर यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थिनी किन्नरी जाधव हिने, डॉ. वा. ना. बेडेकर लिखित 'स्वप्न साकारत आहे' या कवितेचे अभिवाचन केले. तर प्रा. भालचंद्र कारभारी यांनी आभारप्रदर्शन केले. स्पर्धेसाठी संयोजन समिती सदस्य उपप्राचार्य सुभाष शिंदे, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, प्रा. महेश पाटील, प्रा. विमुक्ता राजे, प्रा. विनोद चंदवाणी, प्रा. नितीन पागी, प्रा. भालचंद्र कारभारी यांनी स्पर्धा

यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे मार्गदर्शन या स्पर्धेसाठी लाभले. महाविद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थिवर्ग मोठ्या संख्येने या स्पर्धेला उपस्थित होते.

**महिला विकास कक्षाचे फेब्रुवारी व मार्च महिन्यातील उपक्रम**

१. मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०१५ रोजी 'महिलांवरील अत्याचार' या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस अर्थात TISS या संस्थेतील विद्यार्थिनी मालविका हिने या विषयावर पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन सादर केले. या कार्यक्रमासाठी तिच्या गटप्रमुख श्रीमती होनावर उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

२. सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी 'व्हय मी सावित्री' या सावित्रीबाई फुल्यांवर आधारित सुषमा देशपांडेलिखित एकपात्री प्रयोगातील काही भागाचे सादरीकरण करण्यात आले. हे सादरीकरण डोंबिवली येथील पेंढरकर महाविद्यालयातील मानसशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. सौ. उज्ज्वला करंडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला विकास कक्षाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला अ. सिंह या होत्या. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला.

३. आंतरराष्ट्रीय महिला दिन व क्रांतिज्योत सावित्रीबाई फुले स्मृतिदिन या निमित्ताने मंगळवार दि. १० मार्च रोजी महाविद्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांनी या दिवसाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचा समारोप महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला अ. सिंह यांच्या मार्गदर्शनपर विचारांनी झाला. डॉ. सुजा अब्राहम यांनी सूत्रसंचलन केले.

महाविद्यालयात Business English Certificate Courses University of Cambridge तर्फे काही इंग्रजीचे Courses सुरू करण्यात आले. २३ मार्च रोजी प्रस्तुत अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाले. विद्या प्रसारक मंडळ व केंब्रिज विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू करण्याचा करार करण्यात आला. त्यानुसार हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या तीन पायऱ्या ठरविण्यात आल्या. १)Preliminary २) Vantage ३) High. त्यानुसार पहिल्या Preliminary पायरीच्या अभ्यासक्रमाची सुरुवात महाविद्यालयाने केली आहे. उर्वरित दोन्ही पायऱ्या २०१५-२०१६ च्या नवीन शैक्षणिक वर्षात सुरु करण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे. मे महिन्यात या विद्यार्थ्यांची परीक्षा होऊन त्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांव्यतिरिक्त बाहेरील विद्यार्थ्यांसाठीही हा अभ्यासक्रम खुला करण्यात आला आहे. तसेच सर्व वयोगटांतील व्यक्ती यात प्रवेश घेऊ शकतील अशी मुभा यात ठेवण्यात आली आहे.

हा अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे मोलाचे मार्गदर्शन व प्रोत्साहन प्राप्त झाले.

महाविद्यालयात 'Humanities' या परिषदेअंतर्गत विविध देश-विदेशातील विद्वान, प्राध्यापक मंडळींचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात विविध देश-विदेशातील कला-वाणिज्य शाखेच्या प्राध्यापकांचा समावेश होता.

१) Univ. of startheyde Glasgow celedoni univ. येथून susan Hart B.A. Ph.D. Dean.

२) Edinburgh univ. Plan Mackay - Deputy Vice Principle International.

३) Univ. of the West Scotland येथून प्रा. पॉल मार्टिन Depute Principal, RN, RHV, MBA Dr.

४) Univ. of Dundee College of life Sciences येथून माइक फर्ग्युसन BE, FRS, FRSE, Medisa, Dean, Research Regius Prof. of life Science

५) Lancaster Univ. प्रा. स्टीव्ह बॅडली - कुलगुरु International

६) Queens Univ. Belfast डॉ. म. सतीशकुमार FRGS, RCS, FHEA

७) Univ of Abredeen प्रा. सेठ डी. कुनिन Ph.D. उपप्राचार्य Internationalisation इत्यादी मान्यवरांनी सहभाग घेतला होत. या सर्व मान्यवरांनी मुंबई विद्यापीठांतर्गत असलेली शैक्षणिक व्यवस्था, विविध अभ्यासक्रम, पदवी इत्यादींची माहिती जाणून घेतली. जोशी-बेडेकर महाविद्यालयातील सर्व सुव्यवस्था, शैक्षणिक व्यवस्था बघून सर्व प्राध्यापक मंडळी अतिशय आनंदित झाली. डॉ. विजय बेडेकरांचे vision बघून भविष्यात महाविद्यालयाशी शैक्षणिक करार करण्याबाबत सर्वांनीच उत्सुकता दाखवली.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**LAW TRYST**

मुंबईतील जे. सी. विधी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'LAW TRYST' मधील 'Big Fight' या वादविवाद स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी सिद्धान्त नायक (प्रथम विधी) व गौरी साखरदांडे (प्रथम विधी) यांनी भाग घेतला. तसेच 'मूट कोर्ट' या स्पर्धेमध्ये विद्यार्थी गौतम जैन (तृतीय विधी) राहुल पै व मनीष काळे (द्वितीय विधी) या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**'मनुपत्राविषयी'ची कार्यशाळा**

**मनुपत्रा डेटाबेस प्रशिक्षण : १३ मार्च २०१५**

विद्यार्थी तसेच शिक्षक ह्यांना ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या मनुपत्रा ह्या डेटाबेसविषयी अधिक माहिती व्हावी, तसेच डेटाबेस हाताळताना त्यात माहिती योग्य रितीने कशा प्रकारे शोधावी ह्याचे प्रशिक्षण देण्याकरता दि. १३ मार्च २०१५ रोजी ग्रंथालयातर्फे प्रशिक्षणसत्र आयोजित करण्यात आले होते. ह्या कार्यक्रमाकरता मनुपत्राचे Regional Head Manager श्री. मनीष विभांदिक उपस्थित होते.

सायंकाळी ६.०० वाजता ग्रंथपाल मिस शीतल औताडे ह्यांनी मनुपत्राविषयी थोडक्यात माहिती देऊन कार्यक्रमास सुरुवात केली. श्री. विभांदिक ह्यांनी अतिशय उत्तमरीत्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे देत त्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. डेटाबेसमध्ये माहिती जलदरीत्या व अचूकपणे कशी शोधावी ह्याविषयीचे तंत्र त्यांनी विद्यार्थ्यांस सांगितले.






**मनुपत्राचे Regional Head Manager श्री. मनीष विभांदिक विद्यार्थ्यांस मार्गदर्शन करताना**

सदर कार्यक्रमास प्रभारी प्राचार्या व प्राध्यापक उपस्थित होते. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांना Electronic Database चा कसा उपयोग करायचा हे सांगून संशोधनासाठी तसेच रोजच्या शैक्षणिक जीवनात, मूट कोर्टसाठी आणि आर्टिकल लिहिण्यासाठी या Database चा उपयोग होतो हे सांगितले.

तृतीय वर्ष विधीचे विद्यार्थी श्री. गौतम जैन ह्यांनी आभारप्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता केली.

**''नीतिमूल्याधारित समाज घडविण्यामध्ये कायदेपंडितांची भूमिका**

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी "Role of Jurist in establishing value

दुर्बल व्यक्ती एखादे उच्च ध्येय समोर ठेवून समाजात वावरु लागते तेव्हा धाडस व साहस हे गुण तिच्यात आपोआप येतात.

based society" या कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. सदर कार्यक्रमात डॉ. रश्मी ओझा, प्राध्यापिका, मुंबई विद्यापीठ यांनी सदर विषयावर मार्गदर्शन केले. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. सुरेश होस्वेट हे अध्यक्षस्थानी होते. सदर कार्यक्रम दिनांक २० मार्च, २०१५ रोजी सायं. ६ वाजता डेव्हिड ससून वाचनालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.

**प्रात्यक्षिक परीक्षा व निकाल**

विधी प्रथम, द्वितीय व तृतीय या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. सदर परीक्षा ह्या दिनांक २, ७, ९ व १० मार्च रोजी पार पडल्या व त्यांचा निकाल दिनांक १८ व २० मार्च रोजी लावण्यात आला. प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक २५, ३० व ३१ मार्च रोजी घेण्यात आल्या.

**स्पर्धा**

१४ व १५ मार्च रोजी ५ व्या एम. के. नाम्बियार मेमोरियल, २०१५ मूटकोर्ट स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या हिमाली पाटील, अंकिता पवार (द्वितीय विधी) व अभिजित सावंत (तृतीय विधी) या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण २८ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. आमचे विद्यार्थी उपांत्य फेरीपर्यंत पोहोचले. सदर स्पर्धा कर्नाटक लॉ सोसायटीचे राजा लखनगौडा विधी महाविद्यालय, बेळगावी यांनी आयोजित केली होती.

**वादविवाद स्पर्धा**

दिनांक १४ मार्च, २०१५ रोजी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, ठाणे यांनी राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी मिस पंचरत्ना रोकडे व मोहन वाघमारे यांनी भाग घेतला.

**बक्षीस वितरण समारंभ**

महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०१४-१५ या कालावधीत आयोजित केलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी पार पडला. सदर समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्रमुख न्यायाधीश, केरळ उच्च न्यायालय श्री. एस. आर. बन्नुरमठ (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग) व श्री. आर. आर. गांधी, जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे उपस्थित होते. मंडळाचे सहसचिव श्री. जे. एन. कयाल यांनीदेखील मंडळाच्या माध्यमातून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत झाल्यानंतर प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी स्वागतपर भाषण करून महाविद्यालयाची ओळख करून दिली. या वेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

माननीय न्यायधीश श्री. एस. आर. बन्नुरमठ यांची ओळख प्रा. विनोद वाघ यांनी करून दिली. या वेळी श्री. बन्नुरमठ यांचा वकीली ते न्यायधीश हा प्रवास सांगताना त्यांनी दिलेल्या महत्त्वाच्या न्यायनिवाड्यांकडेही सर्वांचे लक्ष वेधले.

दुसरे प्रमुख पाहुणे श्री. आर. आर. गांधी, जिल्हा व सत्र न्यायधीश, ठाणे यांची ओळख प्राध्यापक व ॲड. मनीषा वाघ यांनी करून दिली. या वेळी श्री. गांधी यांच्या कामाचे व योगदानाचे कौतुक करण्यात आले.

दोन्ही प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या आयुष्यातील अनेक अनुभव सांगितले जस्टिस बन्नुरमठ हे जादूगारदेखील आहेत हे ह्याच वेळी आम्हांस कळले. श्री. गांधी यांनी विद्यार्थ्यांना न्यायाधीश व वकील होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन केले.

जस्टिस बन्नुरमठ यांनी विद्यार्थ्यांना "CAN I?" ही प्रवृत्ती सोडून "I CAN" ही प्रवृत्ती वाढविण्याचा सल्ला दिला.


दुःख विभागल्याने कमी होते आणि सुख विभागल्याने वाढते.

शेवटी शैक्षणिक, सांस्कृतिक आणि खेळाचे बक्षीस वितरण दोन्ही प्रमुख पहाुण्यांच्या हस्ते पार पडले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी १) अनिल सूर्यवंशी २) नीता संख्ये ३) क्रिष्णा कामत यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठीची व्यवस्था ग्रंथपाल शीतल औताडे यांनी सांभाळली तर आभारप्रदर्शन विद्यार्थी मनीष काळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## तंत्रनिकेतन

**Industry Expectations from Safety Manager या विषयाची १७ वी एकदिवसीय राष्ट्रीय परिषद संपन्न**




**प्रोसिडिंग्ज प्रकाशन प्रसंगी डावीकडून सौ. स्मिता खंडागळे (संघटन सचिव) परिषदेचे सहनिमंत्रक प्रोफेसर व्ही. एस. भाकरे, प्रमुख वक्ते कर्नल ए. के. सेहगल, सन्माननीय पाहुणे Mr. Geoffrey Currie, परिषदेचे अध्यक्ष श्री. जे. एन. कयाळ, परिषदेचे निमंत्रक प्राचार्य दि. कृ. नायक**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनतर्फे १७ वी एकदिवसीय राष्ट्रीय परिषद 'Industry Expectations from Safety Manager' हा महत्त्वाचा विषय घेऊन आयोजित केली होती. दि. ७ फेब्रुवारी २०१५ रोजी पाणिनी हॉल कॉलेज कॅम्पस् येथे १०.०० ते ५.०० या वेळेत पार पडली.

सन्माननीय पाहुणे Mr. Geoffrey Currie (रिजनल OH & S डायरेक्टर, साउथ एशिया आणि आफ्रिका मिडल ईस्ट, हॉलसिम लि.) यांच्या शुभहस्ते परिषदेच्या प्रोसिडिंग्जचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी जागतिक सुरक्षिततेचे व्यवस्थापन आणि भारत व इतर देशांमध्ये असलेल्या दरीविषयीचे भाष्य केले.

कर्नल ए. के. सेहगल (सेवानिवृत्त), (व्हाइस प्रेसिडेन्ट SHE ITD Cementation India Ltd.) हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. सुरक्षितता व्यवस्थापकाकडून औद्योगिक क्षेत्राच्या काय अपेक्षा आहेत या महत्त्वाच्या विषयावर त्यांनी आपले मुद्देसूद विचार व्यक्त केले. त्यांचे सादरीकरण हे फार परिणामकारक आणि खूप उदाहरणासह होते. सुरक्षितता ही आदान-प्रदानावर अवलंबून असल्याचे त्यांनी म्हटले.

जवळजवळ २०० प्रतिनिधी विविध संस्थांतून आणि औद्योगिक क्षेत्रातून आलेले होते. अशा या महत्त्वपूर्ण परिषदेला श्री. जे. एन. कयाळ हे प्रमुख अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. परिषदेचे उद्घाटन सरस्वती गायनाने झाले. परिषदेचे निमंत्रक प्राचार्य दि. कृ. नायक यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. सहनिमंत्रक प्रोफेसर व्ही. एस. भाकरे यांच्या सादरीकरणाने परिषदेचा प्रारंभ झाला. परिषदेला हजर असलेल्या सर्व प्रायोजकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेवटी परिषदेच्या संघटन सचिव सौ. एस. डी. खंडागळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

उद्घाटन अधिवेशनानंतर परिषदेच्या पुढील अधिवेशनाचे प्रमुख म्हणून श्री. प्रशांत कोकीळ (Head-Corp. Env. & Climate change, The Tata Power Company Limited, Mumbai) यांनी काम पाहिले. ह्या अधिवेशनात एकूण चार जणांनी आपले सादरीकरण केले. श्री. कैलास घरत (BARC, मुंबई) यांनी An qudio-visual clip on industrial safety which was self-explanatory या विषयीचे सादरीकरण केले.

Safety aspects to be covered by the Manager of chemical industry बाबतची मते श्री. अविनाश करमरकर (सेवानिवृत्त प्रमुख अभियंता, आर.सी.एफ.) यांनी व्यक्त केली. श्री. अरविंद मांडके (प्रमुख अग्निशामन अधिकारी, ठाणे महानगरपालिका, ठाणे) यांनी "Fire Safety, requirements of Fire Fighting installations and purpose of Mock dills" यासंबंधीची माहिती दिली. श्री. अशोक रायचूर (टेक्निकल सल्लागार, NSC) यांनी पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल्स कंपन्यांतील धोके आणि मुख्य व्यवस्थापनाकडून Safety Professional च्या बाबतच्या अपेक्षा यासंबंधीची मते व्यक्त केली.

दरम्यान सहनिमंत्रक प्रोफेसर व्ही. एस. भाकरे यांनी सर्व वक्त्यांची ओळख करून दिली. त्यानंतर उच्च पातळीवरून वक्त्यांमध्ये गट-चर्चा घडवून आणली. त्यामध्ये श्री. सत्यप्रकाश श्रीवास्तव (ACC Ltd.), श्री. प्रवीण पांचाळ (ITD Cementation India Ltd.), श्री. प्रदीप नकाशे (सेवानिवृत्त EHS मॅनेजर, Glaxo SmithKline Pharmaceutical Ltd.), श्री. अनिल सावंत (NSC) आणि डॉ. प्रवीण दुबे (BARC) इत्यादींचा सहभाग होता.

परिषदेच्या संघटन समितीतर्फे सर्व वक्त्यांचे आणि प्रमुखांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. शेवटी 'वंदे मातरम्' गायनाने परिषदेची सांगता झाली.

**'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे या संस्थेच्या Innovision २०१४-१५ या वार्षिकाचे प्रकाशन दि.२० मार्च २०१५ या दिवशी तंत्रनिकेतनच्या A.V. रूम येथे दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत करण्यात आले.

सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एन. बी. दिवेकर उपस्थित होते. प्राचार्य दि. कृ. नायक, माजी प्राचार्य श्री. एस. एस. मुजुमदार, Innovision च्या संपादिका सौ. वैशाली सोनावणे इत्यादी मान्यवर हजर होते. विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.


कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वतीला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. माजी प्राचार्य एस. एस. मुजुमदार सरांनी सर्वप्रथम प्रमुख अतिथी श्री. एन. नी. दिवेकरांची ओळख उपस्थितांना करून दिली. प्राचार्य दि. कृ. नायक यांनी या प्रसंगी आपले मनोगत वक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते सुंदर अशा Innovision २०१४-१५ या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी प्रा. दिवेकर सरांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशून मौलिक विचार व्यक्त केले. 'अभियांत्रिकीचा विद्यार्थी हा अष्टपैलू असावा' असे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यार्थी Smart Phone च्या पाठीमागे न लागणारा असावा हे आवर्जून सांगितले. प्रा. दिवेकर हे १२ वर्षे ह्याच कॉलेजमध्ये शिकवीत होते. त्या वेळी त्यांच्या कविता 'Polyzine' मध्ये प्रकाशित झाल्या होत्या. त्यातील एक कविता त्यांनी उपस्थितांना वाचून दाखविली. त्यांचे भाषण हे विद्यार्थिकेंद्रित होते. 'शिक्षकांना प्रश्न विचारत चला' असा विद्यार्थ्यांना सल्ला द्यायला ते विसरले नाहीत.

सदर प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या आणि मान्यवरांच्या शुभहस्ते शिक्षक आणि विद्यार्थ्यांना पारितोषके वितरीत करण्यात आली. काही संयोजक विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

प्रा. सौ. वैशाली सोनावणे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. शेवटी इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्सच्या विभागातर्फे गायनाचा कार्यक्रम पार पडला.

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006






# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.